**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**
**कार्यपत्रिका क्रमांक – ४०**
**सभावृत्तांत**

**दिनांक-२०/१/२०२०** **वेळ- दुपारी २.०० वाजता.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जानेवारी - २०२० ची मासिक मा. महापालिका सभा सोमवार दिनांक २०.१.२०२० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | महापौर |
| २) | मा.तुषार रघुनाथ हिंगे | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ५) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ६) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ७) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ८) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ९) | मा.राहुल गुलाब जाधव | |
| १०) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | |
| ११) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| १२) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |
| १३) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |
| १४) | मा.उंडे लक्ष्मण धोंडू | |
| १५) | मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन | |
| १६) | मा.गायकवाड निर्मला मनोज | |
| १७) | मा.सागर बाळासाहेब गवळी | |

,

१८) मा.गोफणे अनुराधा देविदास

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.अजित दामोदर गव्हाणे

२१) मा.लांडगे सारिका संतोष

२२) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२४) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२५) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२६) मा.फुगे भिमाबाई पोपट

२७) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२८) मा.सावळे सिमा रविंद्र

२९) मा.लोंढे नम्रता योगेश

३०) मा.लांडे विक्रांत विलास

३१) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३२) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३३) मा.अनुराधा गणपत गोरखे

३४) मा.मंगला अशोक कदम

३५) मा.अश्विनी भिमा बोबडे

३६) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३७) मा.संजय बबन नेवाळे

३८) मा.भालेकर प्रविण महादेव

३९) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४०) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४१) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४२) मा.पवळे सुमनताई मधुकर

४३) मा.चिखले सचिन तुकाराम

,

४४) मा.जावेद रमजान शेख

४५) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४६) मा.प्रमोद कुटे

४७) मा.राजू मिसाळ

४८) मा.बाबर शर्मिला राजू

४९) मा.अमित राजेंद्र गावडे

५०) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५१) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५२) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५३) मा.ढाके नामदेव जनार्दन

५४) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५५) मा.करुणा शेखर चिंचवडे

५६) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

५७) मा.भोईर सुरेश शिवाजी

५८) मा.अपर्णा निलेश डोके

५९) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६०) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६१) मा.जयश्री वसंत गावडे

६२) मा.कोमल दिपक मेवानी

६३) मा.सुलक्षणा राजू धर

६४) मा.शाम गणपतराव लांडे

६५) मा.सुजाता सुनिल पालांडे

६६) मा.योगेश मंगलसेन बहल

६७) मा.कदम निकीता अर्जुन

६८) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६९) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

,

७०) मा.पाडाळे निता विलास

७१) मा.काळे उषा दिलीप

७२) मा.पवार मनिषा प्रमोद

७३) मा.बारणे अर्चना तानाजी

७४) मा.अभिषेक गोविंद बारणे

७५) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

७६) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७७) मा.निलेश हिरामण बारणे

७८) मा.दर्शले रेखा राजेश

७९) मा.कलाटे मयूर पांडुरंग

८०) मा.ममता विनायक गायकवाड

८१) मा.कामठे तुषार गजानन

८२) मा.चौंधे आरती सुरेश

८३) मा.कस्पटे संदिप अरुण

८४) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८५) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८६) मा.सुनिता हेमंत तापकीर

८७) मा.चंद्रकांत बारकु नखाते

८८) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८९) मा.कुटे निर्मला संजय

९०) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९१) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

९२) मा.आंगोळकर सागर सुनिल

९३) मा.मुंढे उषा अंकुश

९४) मा.कदम शशिकांत गणपत

९५) मा.लोखंडे चंदा राजू

,

९६) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

९७) मा.आशा धायगुडे-शेंडगे

९८) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९९) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१००) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०१) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

१०२) मा.नवनाथ दत्तू जगताप

१०३) मा.संतोष बबन कांबळे

१०४) मा.सोनवणे शारदा हिरेन

१०५) मा. वाबळे संजय मल्हारराव

१०६) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१०७) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१०८) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१०९) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा. श्रावण हर्डिकर – आयुक्त,मा.पाटील-अतिरिक्त आयुक्त (१), मा.अजित पवार – अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कोळंबे-मुख्य लेखा अधिकारी, मा.कुंभोजकर- मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.पवार- उपसंचालक नगररचना, मा.निकम, मा.भालकर - सह शहर अभियंता, मा.सवणे- प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.खोत, मा.बोदडे, सहा.आयुक्त, मा.बहुरे, मा.गाडेकर- प्र.सहा.आयुक्त, मा.साळूंके – मुख्य उदयान अधिक्षक, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे- अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वायसीएमएच, मा.कुलकर्णी, मा.पुजारी, मा.घुबे, मा.काळे - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोफणे-आरोग्याधिकारी, मा.वस्ते- प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर –** मा.नगरसेवक,नगरसेविका,आयुक्त,अधिकारी वर्ग पत्रकार सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.विलास मडिगेरी – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मौजे च-होली, रावेत व बो-हाडेवाडी येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे बांधणे प्रकल्पांसाठी

,

लाभार्थी व हिस्सा व सोडत प्रक्रिया निश्चित करणेस मान्यता मिळणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल - ९९ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

२) पिंपरी चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता शहरास वाढीव पाणीपुरवठा करण्याची गरज भागविणेसाठी अशुध्द जलउपसा केंद्र रावेत येथून प्रतिदिन १०० द.ल.. अतिरिक्त जलउपसा करणेकामी अशुध्द जलउपसा केंद्र,रावेत पंपगृहामधील पंपींग मशिनरीची क्षमता वाढविणे अनुषंगिक कामे करणे तसेच से.क्र.२३ येथील जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता वाढविणे या कामाचे लेखाशिर्ष निर्मीती व प्रशासकीय मान्यता र.रु.५० कोटी करीता मंजुरी मिळणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल - ९९ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.नामदेव ढाके -** जम्मु-काश्मीरमध्ये झालेल्या हिमस्खलनात चार जवान शहिद तसेच बापु नाडकर्णी- भारतीय क्रिकेट संघातील जेष्ठ माजी क्रिकेटपटू, चंद्रकांत कहाणे – पिंपरी चिंचवड महापालिकेतील लिपीक कर्मचारी,अरुण सावंत – मुंबईतील प्रसिध्द गिर्यारोहक,कै.गणपत श्रीहरी शेडगे,कै.हिराबाई गणपत शेडगे,कै.विलास दशरथ कु-हाडे,कै.सोपानराव बाबुराव लांडगे,कै.तुळशीदास नाणेकर,भोसरी,जयवंत मल्हारी कुटे,सौ.सरस्वती सुरेश शिंदे,मोरेवस्ती चिखली,लक्ष्मीबाई बबन घोलप यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.ज्ञानेश्वर थोरात** – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** – श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

,

मा.विशेष महापालिका सभा क्रमांक- ३८ दिनांक २२/११/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.दत्तात्रय साने –** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह आयुक्त साहेब मी आपल्याला सांगू इच्छितो की, परवा माझ्या प्रभागामधील एक होतकरु भगिनी आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी आकुर्डी रेल्वे स्टेशनच्या रस्त्याकडे जात असताना त्याठिकाणी त्या महिलेचा आपल्या शासकीय कामाच्या खड्डयामुळे अपघात होऊन त्या महिलेच्या डोक्यावरुन चाक जाऊन तिचा मृत्यू झालेला आहे. एक अतिशय होतकरु भगिनी माझ्या प्रभागामध्ये अनेक वर्षापासून रहात असताना तिचा व्यवसाय आकुर्डी भाजी मंडईमध्ये २०/२२ वर्षापासून भाजी विक्रीचा व्यवसाय करीत आहे तिला एक मुलगा आणि मुलगी यांचा सांभाळ करीत होती.अशी परिस्थिती असताना तिचा दुर्देवी मृत्यु झालेला आहे. आजच्या लोकमत पेपरला मोठी बातमी आहे. माझ्या पत्रकार बांधवानी आपल्या अधिका-यांना ॲक्सीडेंटबाबत विचारल्यानंतर चांगल्या प्रकारे उत्तरे देण्यात आलेली नाही त्यांची बातमी मी आपल्याला वाचून दाखवितो. स्मार्ट सिटी अंतर्गत सीसीटीव्ही केबल टाकण्यासाठी शहर सध्या प्रोग्रेसिव्ह आहे. याबाबत स्मार्ट सिटीचे अशोक भालकर यांना विचारले असता आकुर्डी विभागाचे काम आमचे नसुन पालिकेचे काम सुरु असावे असे उत्तर दिलेले आहे. त्यानंतर हे खड्डे बीआरटीचे असावे यासाठी बीआरटीचे श्री.विजय भोजने यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी या खड्डयाबाबत हात झटकले.आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळ फुटपाथचे काम चालू असुन खड्डयाशी आमच्या विभागाचा संबंध नाही. असे उत्तर दिलेले आहे. दोन्ही विभागानी जबाबदारी ढकलल्याने विषयाशी जबाबदारी नक्की कोणाची आहे. महानगरपालिकेच्या वतीने त्याठिकाणी दोन्ही कामे चालू आहेत एका बाजुला स्मार्ट सिटीचे काम चालू आहे, एका बाजुला खोदाईचे काम चालू आहे,एका बाजुला फुटपाथचे काम चालू आहे. मी काल त्याठिकाणी प्रत्यक्ष जाऊन बघुन आलो. आणि या निमित्ताने आमचा पत्रकार बांधव विचारत असेल की, हा ॲक्सीडेंट झाला आहे.खडयावरुन गाडी घसरली गेली आणि ती महिला खाली पडली आणि त्यांचा मुलगा हा रस्त्याच्या पलीकडे पडला. आणि त्याचवेळेस त्या महिलेच्या डोक्यावरुन चार चाकी वाहन गेले.आणि यामध्ये त्या महिलेचा मृत्यु झालेला आहे. असं असताना जर आम्ही तुम्हांला विचारलं याची जबाबदारी कोणाची महानगरपालिकेचे जे रस्ते आहेत ते सर्वसामान्य नागरीक खोदत नाहीत तिथे त्या महिलेचा मृत्यू झालेला आहे. असं असताना प्रशासन जर हात वर करीत असेल तर याच्यापेक्षा दुर्देवी बाब कुठली असेल.अजुन किती बळी घेणार आहोत आज या शहरामध्ये अनेक ठिकाणी रस्त्याचे काम चालू आहेत, खड्डे खोदाईचे काम चालू आहे त्याठिकाणी बॅरीकेटस् लावण्याचं काम कोणाचं आहे. या भगिनी भाजी मंडईमध्ये भाजीचा व्यवसाय करीत होती. या महिलेचा नाहक बळी गेलेला आहे. नशिब त्यांचा मुलगा पलीकडच्या बाजुला पडला. त्यामुळे तो

,

वाचला आहे.  या घटनेला जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करावी. कुठलाही अधिकारी जबाबदारी घेणार नसेल तर हे कोणी केलं आहे. त्याठिकाणी त्या महिलेचा मृत्यू झालेला आहे यासारखा अजुन काय पुरावा पाहिजे. शहरामध्ये जी खोदाई चालू आहे त्याठिकाणी साधं बॅरीकेटस् सुध्दा लावलं जात नाही. शहरामध्ये अनेक ठिकाणी खोदाई चालू आहे त्याठिकाणी सुपरवायझर नाही का? आपण एवढे मोठे सल्लागार नेमलेले आहेत ते काय आपले जावई म्हणुन काम करायला आलेले आहेत का,आयुक्त साहेब याला कोण जबाबदार आहे ते सांगा. आज या भगिनींवर वेळ आलेली आहे उद्या काहीही होऊ शकतं या घटनेला कोण जबाबदार आहे याचं आयुक्त साहेबांनी उत्तर द्याव अशी विनंती करतो.धन्यवाद.

**मा. राहूल जाधव -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह ख-या अर्थानी काकांनी आज जो विषय  घेतलेला आहे शहरामध्ये जे खड्डे घेतले जातात आणि त्यामुळे नागरीकांचे जे बळी जातात त्याला ख-या अर्थानं कारणीभूत कोण आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये वाढत्या लोकसंख्येनुसार आणि आपल्या डेव्हलपमेंटमुळे स्मार्ट सिटी किंवा अमृत योजना असेल याठिकाणी आपले रस्ते खोदाईची कामे चालू आहेत आपण यामध्ये कुठे परमीशन दिलेली आहे आणि अनधिकृतपणे कुठे खोदाई चालू आहे याच्यावर सुध्दा प्रशासनाने लक्ष केंद्रीत करणं गरजेचं आहे. आपण स्थापत्य विभागाच्या माध्यमातून विविध ठिकाणी रस्ते करतो. परंतु त्या रस्त्याची किंमत ना कोणत्या ठेकेदाराला आहे ना कोणत्या अधिका-याला आहे. ज्या ज्या ठिकाणी रस्ते खोदाईचे काम चालू आहे त्याठिकाणी बॅरीकेटस्  लावणं तेवढंच गरजेचं आहे. मा.महापौर साहेब, मी आपल्याला आवर्जुन सांगतो की, आपण आजच असे आदेश देण्यात यावे की, ज्या ज्याठिकाणी खोदाई चालू आहे त्याठिकाणी परमीशन असेल तरच खोदाई करावी. अन्यथा शहराचं विद्रुपीकरण करु नका. आपण ज्याठिकाणी परमीशन दिलेली नाही त्याठिकाणी सुध्दा खोदाईचे काम चालू आहे.  तेंव्हा आपण संबंधित विभागाला सांगावं की,ज्याठिकाणी खोदाई चालू आहे त्याठिकाणी आपण त्यांना परमीशन दिलेली आहे का?  विनाकारण नागरीकांचे बळी जातात आणि त्यामुळे महापालिकेचं नांव बदनाम होतं  त्यामुळे आपण आजच संबंधित विभागाला सूचना देण्यात याव्यात. धन्यवाद.

**मा.महापौर** – मा.आयुक्त साहेब,यासंबंधी खुलासा करतील.

**मा.आयुक्त** - मा.महापौर साहेब,सन्मा.सभागृह आकुर्डी रेल्वे स्टेशनच्या रस्त्यावर दुचाकीची घटना घडली त्याच्यामध्ये एका महिलेचा मृत्यू झालेला आहे. ही अत्यंत गंभीर गोष्ट आहे. याची दखल प्रशासनाच्या वतीने निश्चितपणे घेण्यात येत आहे. संबंधित ठिकाणी कशा प्रकारे घटना घडली त्याला कंत्राटदाराची जबाबदारी आहे का? कुठल्या विभागाची जबाबदारी आहे याची सविस्तर चौकशी करुन जॉईंट सिटी इंजिनियर श्री.सवणे आणि अप्पर आयुक्त (१) श्री.संतोष पाटील यांनी पूर्ण घटनेची चौकशी करावी त्याठिकाणी बॅरीकेटस्  होतं का नव्हतं घटना कशा प्रकारे घडली आणि त्याला कोण जबाबदार आहे

,

आपले कंत्राटदार जर  जबाबदार असतील तर त्यांच्यावर गंभीर अशा स्वरुपाची कारवाई करणं अपेक्षित आहे. सभागृहाला मी एक बाब सांगू इच्छितो की, यापुर्वी अशा प्रकारच्या ज्या घटना घडल्या त्यावेळेला याच सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झालेली होती. कुठल्याही नागरीकांना दुखापत होऊ नये, जीव तर जाऊच नये यासाठी संपुर्ण बाब गांर्भीयाने प्रशासनाने घेतलेली आहे. तशा सूचना सर्व विभागांना देण्यात आलेल्या आहेत. ज्याठिकाणी कुठल्याही प्रकारचं स्थापत्य विभागाचं किंवा खोदाईचं कुठलही काम असेल तर  त्याठिकाणी बॅरीकेटींग करावं  त्या स्वरुपाचा सभागृहाचा जो ठराव होता त्याची अंमलबजावणी करुन त्याच परिपत्रक देखील संबंधित विभागांना इश्यू करण्यात आलेलं आहे. पुनश्च सर्वच विभागांना विशेषत: स्थापत्य विभाग,विदयुत विभाग असेल,बीआरटी विभाग, स्मार्ट सिटी असेल,पाणीपुरवठा आणि जलनिस्सारण विभाग असेल सर्वांना सूचना आहेत की, ज्याठिकाणी आपली कामे सुरु असतात त्याठिकाणी आपण पॉलीशी केलेली आहे त्या अनुषंगाने सर्व संबंधित विभागाशी समन्वय ठेवुन कुठल्याही प्रकारची खोदाई करण्यापुर्वी ज्या  सेफ्टी इन्स्ट्रक्शनस्  आहेत  त्याचं पालन केल जात आहे याची खबरदारी घेण्याची ही आपल्या विभागाची विभाग प्रमुख म्हणुन आपली जबाबदारी राहील. आणि ती राहणार आहे. जी घटना घडली त्याचा ३ दिवसामध्ये अप्पर आयुक्त १ जॉईंट सिटी इंजिनियर सवणे यांनी माझ्या समोर ठेवावा जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर गंभीर कारवाई करण्यात येईल. सविस्तर चौकशी करण्यात येईल.

**मा. राहूल जाधव -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह आयुक्त साहेबांनी संबंधित विभागांना सक्त सूचना दिलेल्या आहेत. जी घटना घडली त्याठिकाणी बॅरीकेटस्  होते किंवा नव्हते. आणि कशामुळे घडली याची चौकशी करण्याचे आदेश आता आपण दिलेले आहेत. ज्याच्यामुळे हा अपघात घडलेला आहे त्याची आपण सखोल चौकशी करणार आहोत.या शहरामध्ये नगरसेवक,नगरसेविका काम करीत आहेत. ख-या अर्थानं काम करीत असताना त्यांच्याकडनं सुध्दा खुप मोठया अपेक्षा या शहरातील जनतेला आहेत. ज्या सूचना आणि आदेश आपण संबंधित विभागाला दिलेल्या आहेत त्याच्यावर आपण काय कारवाई केली याची लेखी माहिती आपण तुमच्यासाठी मागविली आहे आणि तीच माहिती  पुढच्या जनरल बॉडीला सदस्यांना देण्यात यावी. कारण या शहरामध्ये काम करीत असताना आपले अधिकारी सर्वच मनावर घेऊन काम करीत नाहीत अशा सूचना या आधी भरपूर दिलेल्या आहेत. त्या किती शेवटापर्यंत गेल्या हे आम्हांला आणि संपुर्ण प्रशासनाला माहिती आहे. त्यामुळे संपुर्ण माहिती येणा-या जीबी मध्ये देण्यात यावी अशी मी विनंती करतो.धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह ख-या अर्थानी याठिकाणी दत्ताकाका साने यांनी त्यांच्या वॉर्डातील घडलेली घटना सांगितली ही अत्यंत दु:खद घटना आहे. मागच्या वेळेस आमच्या वॉर्डातील घडलेल्या घटनेवर चर्चा केलेली होती. मा.आयुक्त साहेब, मी आपल्याला विनंती करते की, नगरसेवक म्हणुन मग तो

,

कोणत्याही पक्षाचा असो आम्हांला आमचा नागरीक हा सर्वात जास्त मोलाचा असतो त्यामुळे सर्व सदस्य तुम्हांला जीव तोडून सांगत असतात. मागची २० तारखेला सभा झाली त्यावेळेस देखील आपण चर्चा केलेली होती. आणि आम्ही त्यावेळेस सांगितल होतं की, एखादयाचा जीव किती महत्वाचा असतो आणि एखाद्याची दु:खद घटना घडल्यानंतर सभागृहात येऊन चर्चा करुन जे काही समाधानकारक उत्तर पाहिजे असते ते मिळत नाही. असे असताना देखील आपण मागच्या १० तारखेच्या जीबीला चर्चा केलेली होती. आज २० तारीख आहे आणि आम्हांला प्रशासनाकडुन जो काही बदल हवा होता,जी काही अपेक्षा होती ती सगळया अधिका-यांनी मिळून त्याठिकाणी जी काही परिस्थिती होती ती सांगितली पाहिजे. जे सामान्य नागरीक म्हणुन मला जे दिसते ते मी या सभागृहाला सांगितले होते. आणि निश्चितपणे एक कार्यक्षम आयुक्त म्हणुन तुमच्याकडुन तितकीच अपेक्षा होती. कुठं तरी आमचा अपेक्षाभंग होताना आम्हांला दिसतो. अधिकारी काम निश्चितपणे करतात आम्ही माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागतो आम्ही तुम्हांला रेट सांगतो तुमचे बजेट आहे सगळीच काम महत्वाची आहेत पण आमच्या नागरीकाचा जीव तितकाचा महत्वाचा आहे असे आम्हांला वाटते. आणि म्हणुन महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करते की, पुढच्या जीबी पर्यंत संपुर्ण शहरामध्ये खडी दिसुच नये अशा प्रकारचा आदेश आपण आयुक्त साहेबांना द्यावा जेणेकरुन यापुढच्या काळात जसे मागच्या काळात मी असेन,राजु बनसोडे असेल, माई असतील आम्ही सगळयांनी दु:ख व्यक्त केलं आणि तीच घटना या शहरामध्ये आपल्याला पुन्हा पहायला मिळते. हे यापुढे होणार नाही यासाठी जी काही दक्षता घेता येईल संबंधित ठेकेदाराला नोटीस काढा, अधिका-याला काढा जे काही करता येईल ते करा. परंतु यापुढच्या काळामध्ये शहरामध्ये निश्चितपणे विकास कामे करावी लागणार आहेत खोदाईची कामे नक्की करावी लागणार आहेत आज शहर खुप वाढलेलं आहे आणि याठिकाणी नवनवीन संकल्पना आपल्या मार्फत या शहरामध्ये आणतोय. त्यामुळे या कामासाठी जी खोदाई होणार आहे. त्यामध्ये अशी घटना घडली नाही पाहिजे. यासाठी आपली तितकीच तयारी असली पाहिजे. अशा प्रकारे मी आपल्याला विनंती करते की, तुम्ही आयुक्त साहेबांना असे आदेश देण्यात यावे की, शहरामध्ये कुठेही खोदाईचे काम चालू असेल त्याठिकाणी बॅरीकेटस लावुन लोकांच्या संरक्षणासाठी जे काही करता येईल ते १०० टक्के कराव अशी विनंती करते.

**मा.नाना काटे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह महापौर साहेब, परवाच आपली एक मिटींग झालेली होती आणि त्या मिटींगमध्ये आदरणीय नेते पालकमंत्री अजितदादा पवार यांनी एक निर्णय घेतला पुर्वी मेट्रोला "**पुणे मेट्रो**" असं नांव होतं आता **"पुणे-पिंपरी चिंचवड मेट्रो"** असे नांव दादांच्या माध्यमातून देण्यात आलं आहे तरी याठिकाणी मा.अजितदादा पवार यांचे अभिनंदन करण्यात यावे.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह, याठिकाणी दादांच्या अभिनंदनाचा जो ठराव मांडला आहे त्याला अनुमोदन देतो.

,

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह या अभिनंदनाच्या ठरावा बरोबरच काल आपल्या वायसीएमएच मध्ये एका गरीब महिलेच्या पोटातून साडेतीन किलोचा टयुमर आपल्या वायसीएमएचच्या डॉक्टरांनी अगदी यशस्वीपणे गुंतागुंतीची शस्त्रक्रीया यशस्वीपणे राबविली आणि त्या महिलेचा जीव वाचविला. म्हणुन त्या डॉक्टरांच्या टिमच मी अभिनंदनाचा ठराव मांडते. डॉ.संजय पाडळे, डॉ.कांचन नाईकवडे, राहूल निकम, जितेंद्र वाघमोडे, चैत्राली महाडीक आणि त्यांच्याबरोबर असलेल्या सर्व कर्मचा-यांचे टिम असेल या सर्वांचे अभिनंदन करण्याचा ठराव मांडते. मा.महापौर साहेब, वायसीएमएचवरती प्रत्येक वेळी टिकाच होत असते आणि एवढ मोठं हॉस्पिटल आहे त्यामध्ये चांगल काम करणा-याचं अभिनंदन सुध्दा केल पाहिजे. जेणेकरुन त्याठिकाणच्या डॉक्टराच मनोधैर्य वाढलं पाहिजे. म्हणुन यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडते.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर –** सर्वांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

**मा.सागर आंगोळकर –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक-१

दिनांक २०/१/२०२० खाते- मा.आयुक्त

**संदर्भ** – १) मा.सागर आंगोळकर, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव–
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.५९६५ दि.२७/११/२०१९
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४८३ दि.०६/०१/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करताना संबंधित जमिन मालकास मोबदला अदा करताना मा.महापालिका सभा ठराव क्र.३९९ दि. २१/११/२०१३ नुसार मंजूर कार्यपध्दतीत व धोरणानुसार कार्यवाही करावयाच्या प्रकरणात नुकसान भरपाई अदा करताना ३०% दिलासा रक्कम देण्यास मान्यता देणेत आली आहे. तदनंतर मा.महापालिका सभा ठराव क्र.७७४ दि.२०/११/२०१५ अन्वये सदर धोरणात बदल करून नविन भूसंपादन कायदा २०१३ मधील तरतूदी नुसार ज्या मिळकत धारकांचे क्षेत्र ० ते ३०० चौ मी. आहे अशा बाधित छोट्या छोट्या मिळकतधारकांना १००% दिलासा रक्कम व ३०० चौ.मी पेक्षा जास्त क्षेत्राचे भूखंड धारकांना ३०% दिलासा रक्कम या प्रमाणे मान्यता देणेत आलेली आहे. सबब, दि.२०/११/२०१५ नंतर ३०० चौ.मी. पेक्षा

,

मोठ्या भूखंडाचे विभाजन करून तुकडा ३०० चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्राचा भूखंड केलेल्या सर्व प्रकरणात सांत्वना रक्कम ३०% इतकीच देय राहिल यास मान्यता देणेत यावी.

**मा.अंबरनाथ कांबळे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सागर आंगोळकर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ चा विचार माहे एप्रिल-२०२० चे सभेमध्ये करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब,सदर सुचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक- ४९६ विषय क्रमांक-१

दिनांक २०/१/२०२० खाते- मा.आयुक्त

**संदर्भ** – १) मा.सागर आंगोळकर, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव–
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.५९६५ दि.२७/११/२०१९
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४८३ दि.०६/०१/२०२०

विषय क्रमांक १ चा विचार माहे एप्रिल २०२० चे सभेत करणेत यावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.अजित गव्हाणे –** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह हा विषय खरं म्हणजे तहकुब करायला नाही पाहिजे. मागच्या मिटींगमध्ये सुध्दा चुकीच्या पध्दतीने विषय तहकुब ठेवणेत आला होता. त्याची नेमकी कारणं आम्हांला माहित नाहीत. तुमच्या पक्षाच्या बैठकीत काय ठरलं परंतु हा विषय शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. एखादया व्यक्तीला विरोध म्हणुन विषय तहकुब ठेवणे योग्य नाही. आपण भूसंपादन प्रक्रिया राबवून ज्या जागा ताब्यात घेतो त्यावेळेस त्या रक्कमेवर १०० टक्के दिलासा तर देतोच

**( गोंधळ )**

**मा.अजित गव्हाणे** – चेअरमन साहेब, सगळयांना या विषयावर बोलू द्या. सगळयांना विषय समजला पाहिजे. जेंव्हा आपण जमीनीचं भूसंपादन करतो त्यावेळेस त्याला आपण

,

१०० टक्के दिलासा देतो. प्लस व्याज देतो त्यावर २६ नोटीस काढली जाते त्यावेळेस त्याला पैसे मिळेपर्यंत व्याज देतो. या भूसंपादन कायद्यामध्ये अशा प्रकारची तरतुद आहे. महापालिकेचे त्याठिकाणी जास्त पैसे जातात दुस-या बाजुला एका व्यक्तीची खाजगी वाटाघाटीने आपल्याकडे आला आणि आपण मागच्या काळामध्ये ३ गुंठयाच्या आतील क्षेत्र असेल त्याला आपण अशा पध्दतीने १०० टक्के दिलासा देण्याची घोषणा केली आणि प्रत्येक केसमध्ये महापालिकेने अशा पध्दतीने त्यांना दिलासा दिलेला आहे. ३ गुंठयाच्या आतील ज्या जागा आहेत त्या जागा सर्वसामान्य माणसांच्या आहेत. आणि आता आपण सर्वजण ज्या परिसरामध्ये राहतो. मुळच्या शेतक-यांच्या जागा अनेक प्रकल्पासाठी ताब्यात घेण्यात आलेल्या आहेत त्यामध्ये केंद्रशासन असेल,महाराष्ट्र शासन असेल दुसरं आमच्या भोसरी,दिघी आणि च-होली परिसराचा विचार केला तर आमच्याकडे सेंट्रल ऑफ इंजिनियरींगनी जागा ताब्यात घेतल्या, एमआयडीसीने आणि प्राधिकरणाने जागा ताब्यात घेतल्या आहेत. आमच्याकडे मॅगझीन झाल आणि त्यामुळे उरलेल्या ज्या जागा आहेत त्या कमी जागा मुळच्या शेतक-यांकडे राहिलेल्या आहेत. आणि ज्या कामगारांच्या जागा ताब्यात घेतलेल्या आहेत त्यांच्याकडे सुध्दा खुप कमी जागा राहिलेल्या आहेत. आणि अशा परिस्थितीमध्ये जेंव्हा एखादी व्यक्ती १,२,३ गुंठा जागा तुमच्याकडे खाजगी वाटाघाटीने येतील तेंव्हा अशा पध्दतीने भूमिका घेणं अत्यंत चुकीचं आहे. आपण चुकीच्या पध्दतीने विषय हाताळत आहोत. एखाद्या विषयाला एखाद्या ठिकाणी काही घडलं म्हणजे हा नियम सगळीकडे लागू ठेवणं योग्य नाही. म्हणुन आमच्या परिसरामध्ये जागेच्या किंमती अत्यंत कमी आहेत. आमच्याकडील रेडीरेकनरचा रेट पाहिला तर च-होली, डुडुळगांव, दिघी या परिसरामध्ये अत्यंत कमी रेट आहेत. आणि अशा पध्दतीमध्ये जेंव्हा एखाद्याचं बांधकाम असेल तर ते पाडलं जातं आणि बांधकाम पाडल्यानंतर त्याला त्याचा मोबदला मिळत नाही. एक तर त्याची बांधकाम ग्रामपंचायतीच्या कालावधीमध्ये झालेली आहेत. त्यावेळी काही लोकांनी अनधिकृत बांधकाम केलेली आहेत. आणि त्याची पाडापाडी झाल्यानंतर त्याला फक्त जागेचा मोबदला मिळतो बांधकामाचा मोबदला मिळत नाही. आणि मग त्यावेळी असा १०० टक्के दिलासा दिला तर त्यात चुकीचं काय आहे. मा.महापौर साहेब,आपण एकतर्फी सभागृह चालविता हे योग्य नाही. खरं म्हणजे तुमच्याकडून आमच्या अपेक्षा खुप होत्या पुर्वीच्या काळी तुम्ही चांगलं काम केलं परंतु याठिकाणी महापौर म्हणुन काम करताना तुम्ही अन्याय करण्याची भूमिका याठिकाणी करीत आहात हे सगळया नगरसेवकांच्या निदर्शनास येत आहे. आणि तुमच्या काळात नगरसेवकांची दिशाभूल होत आहे. महापौर साहेब,हे कुठं तरी

'

थांबल पाहिजे. आणि हा विषय मागच्या सभेला होता त्याठिकाणी स्मार्ट सिटीसाठी क्षेत्र ताब्यात घ्यायचं होत आणि त्यातलं ५० टक्के क्षेत्र ताब्यात आलं होत आणि ५० टक्के क्षेत्र ताब्यात आल नव्हतं त्यावेळी तुम्ही भूसंपादनाचा विषय मंजुर करुन घेतला आमची काही हरकत नाही पण त्या क्षेत्राचे त्याला किती पैसे मिळणार आहेत. .....

**मा.महापौर** – हा विषय तहकुब ठेवणेत आलेला आहे ज्यावेळेस हा विषय अजेंडयावर येईल त्यावेळेस या विषयावर सभागृहामध्ये चर्चा करता येईल.

**( गोंधळ )**

**मा.अजित गव्हाणे –** मा.महापौर साहेब असं करु नका मला याठिकाणी प्रशासनाकडुन खुलासा पाहिजे आम्ही पेपरला वाचलं आहे की, दरवर्षी भूसंपादन निधी शिल्लक राहतो.भूसंपादनासाठी असलेली तरतुद दुसरीकडे वर्ग करतो.याही वर्षी त्याच पध्दतीने भूसंपादन निधी शिल्लक राहणार  आहे. त्यामुळे तुम्ही जे कारण सांगताय ते चुकीचं आहे त्यामुळे हा विषय तहकुब न करता मंजुर करणेत यावा.जेणेकरुन आपल्या इथल्या छोटया,छोटया प्लॉटधारकांचा त्यामध्ये फायदा होईल. शहराच्या हिताचा हा विषय आहे. तेंव्हा हा विषय तहकुब करु नये अशी विनंती आहे.

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह  हा विषय आणण्याची वेळ का आली आहे याचा प्रशासनाने खुलासा करावा. भूसंपादनाचे डीसी रुल्स तुमच्याकडे आहेत भूसंपादन करताना डिसीजन हे आयुक्तांच असतं त्या माणसाला डब्बल रक्कम देतो हे सगळं नियमात असताना हा रुल का आला सदस्य प्रस्ताव असला तरी प्रशासनाने याचा खुलासा करावा. या विषयावर इतकी चर्चा झाली आहे की, याठिकाणी नगरसेवकांना चोर म्हणलेले आहे आता इथं कोणते नगरसेवक चोर आहेत हे सांगितलेलं नाही. चोर कोण आहे आणि कोणी विषय आणलेला आहे. याठिकाणी तुम्ही फक्त ३०० स्केअरफुटच जागा ताब्यात घेणार असं काही लिहिलं आहे का? आयुक्त साहेब,मला तुमच्याकडुन खुलासा पाहिजे. हा विषय आणण्याची गरज का वाटली. आणि या विषयावर आम्ही काय केलं पाहिजे. जोपर्यंत तुम्ही विषय मंजुर करणार नाही तोपर्यंत तुम्ही मोबदला देणार नाही. डीसी रुल काय म्हणतो मोबदला दिला पाहिजे की नाही. खुलासा केल्याशिवाय जी.बी.चालणार नाही.

**( गोंधळ )**

,

**मा.महापौर** – वैशालीताई हा विषय तहकुब ठेवणेत आलेला आहे ज्यावेळेस पुढील जीबीच्या अजेंडयावर विषय येईल त्यावेळेस चर्चा करता येईल.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ४९७ विषय क्रमांक-२

दिनांक २०/१/२०२० खाते- मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र
क्र.फक्षेका/स्था/८५५/२०१९ दि.०९/१२/२०१९
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.६२२५, दि.२७/१२/२०१९

प्रभाग क्र.१३ निगडी येथील से.क्र.२२ येथील मधुकर पवळे शाळेस ३० वर्ष अधिक कालावधी झालेला असल्याने सदर इमारतीचे स्ट्रक्चरल स्थिती जाणून घेणेकरीता Structural auditor M/s KBP Civil Engineering Services यांचेकडून Structrul Audit करण्यात आले होते. त्यानुसार Structrul Audit अहवालानुसार सदर इमारत व्यापक स्वरूपात दुरूस्ती केल्यावरच वापरण्यास योग्य आहे, अन्यथा हि इमारत धोकादायक ठरू शकते. असे अहवालात नमुद केले होते. त्यानुसार दिनांक २२/८/२०१९ रोजी या विभागामार्फत शाळा इमारतीचा वापर तात्काळ बंद करणेकामी प्रस्ताव पाठविणेत आला होता. त्यावर मा.आयुक्त सो यांनी दिलेल्या शेरांकनानुसार शिक्षण मंडळाकडे सदर शाळेचा वापर बंद करावयाचे झाल्यास शाळांची पर्यायी व्यवस्था करणेबाबत अभिप्राय मिळणेकामी पत्र पाठविले होते. त्याअनुषंगाने शिक्षण मंडळाकडून फ प्रभागाकडे अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालानुसार शाळा बाजुच्या नविन इमारत व प्रार्थना हॉल येथे स्थलांतरीत करणे शक्य असल्याचे कळविले आहे. सदर शाळा हि रेड झोन मध्ये असल्याने नविन बांधकाम करता येणे शक्य नाही. Structural auditor M/s KBP Civil Engineering Services यांनी Retrofitting पद्धतीने दुरूस्ती करणे बाबत शिफारस केली आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास सुमारे ३० लाख खर्च अपेक्षीत आहे. Internal structure Component च्या स्थितीप्रमाणे सदर अंदाजपत्रक हे प्रत्यक्ष काम चालू असताना वाढू शकते. सद्यस्थितीत सदर कामाचे नाव मनपाचे सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात समाविष्ठ नाही. त्यामुळे सदरचे काम हे सन 2019-20 चे अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक आहे. सदर काम करण्यास संबंधित सन्मा. नगरसदस्य यांची काहीही हरकत नसल्याचे त्यांनी पत्राद्वारे कळविले आहे. सबब, मनपा इमारत दुरुस्तीचे काम "स्थापत्य विषयक कामे करणे" या लेखाशिर्षांतर्गत **र.रु.50,00,000/-** इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता व **र.रु.20,00,000/-** इतकी

,

तरतुद ही "प्रभाग क्र.१३ येथील धर्मवीर संभाजीराजे क्रिडासंकुल विकसीत करणे" या कामाच्या "स्थापत्य विषयक कामे करणे" या लेखाशिर्षकावरुन वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.राहूल जाधव** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह खरं तर शाळेचा विषय आहे त्याला अनुसरुन पिंपरी चिंचवड शहरामध्ये क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात आलं त्याबद्दल क्रीडा समितीचे सर्व सदस्य व मा. अध्यक्ष तुषार हिंगे यांचे मनापासून हार्दीक अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे मुख्य विषयाकडे वळतो विषय अत्यंत महत्वाचा आणि खूप जिव्हाळयाचा आणि त्याचप्रमाणे वेदना देणारा सुध्दा विषय आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सगळया शाळांपैकी एक असलेली कै.मधुकर पवळे शाळा अत्यंत पटसंख्या असलेली, भरपूर विद्यार्थी असलेली आणि त्या शाळेचं नुतनीकरण करणेत यावे असे आम्ही गेली कित्येक वर्ष मागणी करीत आहोत. परंतु रेडझोन असल्यामुळे या शाळेचं नुतनीकरण होत नाही. आणि त्या अनुषंगाने शाळेचे देखभाल दुरुस्तीचे काम काढलेलं आहे. परंतु महापौर साहेब,मी तुम्हांला सांगु इच्छितो की, या शाळेचं स्ट्रक्चर ऑडीट हे निगेटीव्ह आलेलं आहे आपण जीव मुठीत घेऊन त्याठिकाणी विद्यार्थ्यांना बसवतो आहे. खरं तर आम्हांला सुध्दा त्या गोष्टीची भिती वाटत आहे. या शाळेला ३० वर्ष झालेली आहेत त्या शाळेच्या विद्यार्थ्यांना दुस-या शाळेमध्ये स्थलांतरीत केलेलं आहे म्हणुन त्याठिकाणची पटसंख्या कमी होईल. मुलींची संख्या कमी होईल याद्दष्टीकोनातून हा विषय तुमच्या समोर आलेला आहे. आपण गेली कित्येक वर्ष रेडझोनच्या विषयावर मात करीत आहोत. महानगरपालिकेतील सर्व अधिकारी न्यायालयाच्या प्रत्येक तारखेला सुध्दा त्याठिकाणी जात आहेत. पण पुढे होत काय,नक्की असं झालं तरी काय? कुठं पर्यंत विषय आला यासंबंधीची सर्व माहिती सभागृहाला मिळणे आवश्यक आहे. कालच २/३ दिवसापुर्वी आपण न्यायालयाच्या मार्फत त्याठिकाणच्या परिसरातील काम चालू केलेल आहे. शाळेचा विषय सोडला तर सेक्टर २२ मध्ये अत्यंत दयनीय अवस्था कोणती असेल तर ती महिलांची आहे त्याठिकाणी आपल्याला शौचालय बांधायचं असले तरी ते आपण बांधु शकत नाही. त्याठिकाणी आपल्याला सार्वजनिक शौचालय बांधायचे असेल, पुरुषांना शौचालय बांधायचे असेल तर ते आपण बांधु शकत नाही. ही अवघड परिस्थिती आहे. एकीकडे आपण स्वच्छ भारत अंतर्गत आपण शहरभर गाजावाजा करतो आहे. ही चांगली गोष्ट आहे. या शहरातील सामान्य नागरीक या रेडझोन मध्ये रहात असल्यामुळे त्याठिकाणी व्यवस्थित लक्ष देवुन काम करणं गरजेचं आहे. माझ्या भागातील सेक्टर २२

,

असेल,तळवडे असेल किंवा ज्याठिकाणी रेडझोन आहे त्याठिकाणी आपण विकास कामे करु शकत नाही. पण हे किती दिवस चालणार आहे यासंदर्भात आपण पाठपुरावा करणं गरजेचं आहे. आपण पाहिलं तर या शहरातील सर्वात जास्त लोकसंख्या सेक्टर २२ स्लममधील आहे. या प्रश्नावर लवकरात लवकर तोडगा काढणं गरजेचं आहे.गेली कित्येक वर्ष सर्व लोक विद्यार्थी असतील,कामगार वर्ग सर्वसामान्य नागरीक असेल हे सर्व सार्वजनिक सुविधांपासून वंचित राहिलेले आहेत. यमुनानगरच्या बाबतीत सांगायचं झाल तर लोकांनी करोडो रुपयांचे बंगले घेतलेले आहेत आणि आज जर का मुलांचे शिक्षण,मुलींचे लग्न करायचे असेल किंवा शिक्षणांसाठी बाहेरगांवी पाठवायचे असेल तर या रेडझोनचा मुद्या उपस्थित होतो. या सगळया गोष्टीकडे लवकरात लवकर लक्ष दिलं तर याच्यावर तोडगा निघणं गरजेचं आहे. मी सन्मा.आयुक्तांना मागणी करतो की, कोर्टात आता नेमकी काय परिस्थिती आहे. त्याचा अहवाल सादर करणेत यावा आणि लवकरात लवकर आणि कुठं तरी आपण नवीन इमारत उभारण्याचा प्रयत्न करु एवढंच बोलतो. जयहिंद जयमहाराष्ट्र.

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह खरं तर हा विषय आमच्या प्रभागातील आहे. आमचे मित्र सचिनभाऊ चिखले यांनी आपल्याला व्यवस्थित माहिती दिलेली आहे. परंतु आयुक्त साहेब गेली कित्येक वर्ष आम्ही सेक्टर २२ मधील शाळा, हॉस्पिटल किंवा ज्या अत्यावश्यक सेवा आहेत त्यासाठी तुम्ही आम्हांला निधी कमी देता. किंवा कमी आहे किंवा रेडझोन आहे अशी कारणे सांगता. रेडझोन उठेल,ना उठेल जे काही असेल हे आम्हांला माहित नाही पण आम्हांला आमच्या नागरीकांसाठी त्याठिकाणी हॉस्पिटलची सुध्दा गरज आहे. जसे शाळेचा विषय घेतला आहे त्या शाळेची डागडुजी करुन चांगली होईल. ती डागडुजी किती दिवस टिकणार आहे हे माहित नाही. त्याच पध्दतीने आपण यमुनानगर सेक्टर २२ मधील जे हॉस्पिटल आहे त्या भागामध्ये रुपीनगर, तळवडे, यमुनानगर,निगडी या भागातील जवळपास जवळ,जवळ २ लाख लोकसंख्या आहे. आणि त्याच्या आवारामध्ये भरपूर अशी जागा आहे की, ज्याठिकाणी आपण काहीच करु शकत नाही. तुम्ही रेडझोन मध्ये बिल्डींगला परवानगी सुध्दा देत नाही. जसे सचिन चिखले म्हणले की, तुम्ही टॉयलेट बांधायला सुध्दा परवानगी देत नाही. रेडझोनमुळे त्याठिकाणी काहीच सुविधा देता येत नाहीत. रेडझोनचे जे काही नियम आहेत ते ज्या जीवनावश्यक गरजा आहेत त्या देण्यासाठी जरा नियम बाजुला ठेवावेत. आणि त्या गरजा देण्यासाठी प्रयत्न करणेत यावा. आम्हांला प्रभागामध्ये काम करताना खूप अडचणी येतात. जेणेकरुन आम्हांला लोकांना सांगता येईल की, तुमच्या ज्या जीवनावश्यक गरजा आहेत त्या देण्याचा आम्ही प्रयत्न करु. याच्यामध्ये घरांचे जे प्रकल्प आहेत यामध्ये ८ ते ९ बिल्डींग पडून आहेत त्याची न्यायालयीन मोजणी चालू आहे यामध्ये काही लोकांनी मोजणी करु दिली आहे काही लोकांनी मोजणी करु दिली नाही.

,

न्यायालयाचा जो काही निर्णय होईल तो आम्हांला माहित नाही परंतु ज्या ९ बिल्डींग आहेत त्यामध्ये ८०० ते ८५० घरे आहेत त्यामध्ये जे पात्र आहेत त्यांना रहायला तरी द्या जेणेकरुन त्यांना झोपडपट्टीमधुन मुक्त करुन त्यांना ती घरे दिली जातील. आयुक्त साहेब,तुम्ही आमचे तीन विषय मार्गी लावावेत अशी मी सर्व नगरसेवकांच्या वतीने विनंती करतो. आणि थांबतो धन्यवाद.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह , खरं तर शिक्षण मंडळ ज्यावेळेस होतं त्यावेळेस वर्षातून एकदाच बोलण्याची संधी मिळायची आता शिक्षण समिती असल्या कारणानं प्रत्येक सदस्याला शिक्षण समितीच्या बाबतीत त्याठिकाणी स्वतंत्र लक्ष देवुन त्यावर कारवाई करण्यासंबंधीचे आदेश प्रत्येक प्रभागातील नगरसदस्य आता यानंतरच्या काळामध्ये देवु शकतात. आमच्या सभापती मनिषाताई पवार यांनी शाळेचा संपुर्ण दौरा आणि समितीमधील सर्वपक्षीय सदस्य यांनी शिक्षण मंडळाला गेल्या २५ वर्षाच्या लागलेल्या अत्यंत वाईट सवयी या शिक्षण मंडळामध्ये प्रचंड आहे. त्याच एका वर्षामध्ये पवित्रकरण होईल अशी काही परिस्थिती नाही. मी मा.आयुक्तांच या सभागृहामध्ये अभिनंदन करतो की, त्यांनी आमची मानसिकता ओळखून त्यांनी ताबडतोब कारवाई करण्याचे आदेश स्थापत्य विभागाला दिलेले आहेत. मी सर्व सभासदांना या ठिकाणी विनंती करतो की, अशा ज्या काही घटना आहेत की, स्थापत्य विभागाला आयुक्तांनी आदेश दिले आणि त्यानंतर आमची मिटींग देखील झाली हे आम्ही या विषयाच्या अनुषंगाने मी सांगत आहे. प्रत्येक नगरसेवकांनी एक शाळा दत्तक घ्यावी आणि त्या शाळेत शिक्षक शिकवतात की नाही ही आपण प्रत्येकांनी आपली नैतिक जबाबदारी म्हणुन पालन करावं काही मुलींच्या संदर्भात सांगायचे झाले तर त्यांना काही बाबतीत वेदना सहन कराव्या लागतात त्या एका महिलाच सांगू शकतात. यासंदर्भात त्यांनी स्वतंत्र बैठक घ्यावी. आयुक्त साहेब,हा जो विषय आहे यामध्ये रेडझोन आहे,प्राधिकरण हद्दीमध्ये आहे,एमआयडीसी मध्ये आहे याठिकाणी आपलं दुर्देव आहे की, याठिकाणी देवाची मंदीर मात्र जबरदस्त फ्लॅक्सची आहेत पण ज्ञानमंदीर मात्र दुरावस्थेमध्ये आहेत आणि हे दुर्देव आहे. नैतिक मुलभूत ज्या सुविधा ज्या आहेत आपण दिल्लीमध्ये महापालिकेच्या शाळेमध्ये प्रवेश मिळत नाही. प्रायव्हेट शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी गर्दी नसते परंतु महापालिकेच्या शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी गर्दी असते. आपल्याकडे एकही शिक्षकाचा मुलगा महापालिकेच्या शाळेमध्ये जात नाही हे आपले दुर्देव आहे. त्यामुळे शिक्षणासाठी आपण बारकाईने लक्ष देण्याची गरज आहे. आणि त्यासाठी आमची शिक्षण समिती कोणतेही पक्षीय वातावरण न ठेवता त्याठिकाणी काय अमुलाग्रह बदल करता येतील यासाठी प्रयत्न करणार आहे. आयुक्त साहेब, बजेट किती कोटीचं होत याच्यावर शिक्षण समितीचं मुल्यमापन करु नका. पुर्वी मंडळामध्ये खुप धुमाकुळ चालला होता म्हणुन शासनाने महाराष्ट्रातील सर्व शिक्षण मंडळ बरखास्त केलेली आहेत. कारण त्यांच वर्षाच एकदाचं बजेट झालं की, त्यांचा एकच उद्देश खर्च करायचं गुणवत्तावाढीसाठी

,

एकही शिक्षक प्रयत्न करीत नाही. एका पर्यवेक्षकांकडे ३० शाळा आहेत या शिक्षकांना घराचं नियोजन करता येत नाही तिथं ३० शाळाचं नियोजन कसं करणार अतिरिक्त कार्यभार, अतिरिक्त जी भरती चालू आहे त्याच्यामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार चालू आहे. त्याठिकाणी तुम्ही रितसर,रोस्टर पध्दतीने, नियमानुसार जाहिरातीद्वारे तुम्ही भरती करावी. १८/१८ वर्ष एक शिक्षक एकाच शाळेत शिकवतो आहे.आणि त्याची बदली कुठे होते तर सकाळच्या शाळेऐवजी दुपारच्या शाळेत त्याच शाळेत बदली होत असते.आणि काही जण अशा बदल्या मागतात की, प्राधिकरणातून निगडीमध्ये आणि ही सगळी मानसिकता बदलायची असेल तर तुम्ही स्वत: लक्ष दिलेलं आहे त्याचं वेगळं बजेट करा, मध्यवर्ती महानगरपालिकेच्या मुख्य बजेट मधुन यासाठी  तरतुद करावी. आणि आता जे रेडझोनचा प्रश्न आहे, अमुक प्रश्न आहे असे सांगतात अहो अशा काही घटना चाललेल्या आहेत की, महापालिकेच्या हद्यीमध्ये,महापालिकेच्या नावांखाली तिथं कोण लक्ष देत नाही म्हणुन समोर येत नाही. पण ते लक्ष इथं गेलं तरी चालेल, करा दुरुस्त बिल्डींग चांगली झाली तरी चालेल. परंतु शिक्षण मंडळामध्ये धुमाकुळ चालला आहे. त्या शिक्षण मंडळामध्ये कोणाची बदली कोठे करायची, तो कोणत्या नगरसेवकाच्या संबंधित  आहे हे बघतात. एक तर महाभाग दिवसभर जमीनीचे व्यवहार करतो आणि दिवसभर त्याची हजेरी लागली जाते. त्या महाभागाचं नांव मी याठिकाणी घेऊ इच्छित नाही. म्हणुन शिक्षण समितीवर सर्व नगरसेवकांनी आपआपल्या प्रभागातील शाळेमध्ये जाउन त्याठिकाणी मुला/मुलींची काय अडचण आहे ती समजुन घ्या. आमच्या सभापती मनिषाताई पवार यांनी छोटया,छोटया गोष्टीकडे लक्ष दिलेलं आहे. त्याठिकाणी अंडरग्राऊंड ड्रेनेज लाईन पाहिलेलं आहे, बाथरुममध्ये पाण्याचे नळकनेक्शन नसते म्हणुन आरोग्याचे कर्मचारी साफसफाई करीत नाहीत.  पण हे कोणाच्याच लक्षात येत नाही. आणि डेमो कुठला दाखवितात माहिती आहे का? शाळांची पटसंख्या असलेली  शाळा बाहेरच्या लोकांना दाखवतात  आमच्या सारखे महा शिक्षक जगात कुठंच मिळत नाहीत अशा पध्दतीचं वातावरण निर्माण केलं जातं. आणि म्हणुन सर्व नगरसेवकांना विनंती करतो की, कोणीही शिक्षक तुमच्याकडे बदलीसाठी आला तर त्याला जवळ करु नका  त्याची गुणवत्ता तपासून घ्या, आणि त्यांची मुलं त्या शाळेत आहेत का? हे तपासून बघा. आपल्या  महापालिकेच्या शाळेमध्ये एकाही शिक्षकाचा मुलगा त्याठिकाणी नाही. एवढा मोठा पगार घेत आहेत, सगळे वेतन आयोग लागू आहेत. आम्ही शिक्षकांचा आदर करतो पण शिक्षकांनी शनिवारी शाळा सुटल्यानंतरच आयुक्तांशी,सभापतींशी किंवा नगरसेवकांच्या भेटीगाठीचा कार्यक्रम ठेवावा. इतर दिवशी त्यांनी इकडे फिरकू नये असे आदेश आयुक्त साहेबांनी काढावेत अशी विनंती करतो. आपण शाळा इमारती या चांगल्या सजवावेत आणि एक काळ असा येईल की, तुम्ही ठरवल्याप्रमाणे आपल्या शाळेत ॲडमिशन घ्यायला लोक तरसतील. अशा पध्दतीचं तुम्ही वातावरण करु शकता. आपले शिक्षक चांगले आहेत पण त्यांना ज्या सवयी लागलेल्या आहेत काही सवयी आमच्यामुळे सुध्दा

,

लागलेल्या आहेत. या शिक्षकांना इथेच राहु दे,इथेच राहु दे म्हणुन परत ते म्हणतात आमचा वशिला खुप मोठा आहे आम्ही काय घाबरत नाही.कसे काय हे मुलांना शिकविणार शिक्षण क्षेत्रामध्ये तरी तेवढा पायंडा ठेवा. त्यामुळे आयुक्त साहेब,आणि महापौरांना विनंती करतो की, जे स्ट्रक्चर ऑडिट करायचे आहे ते कोणत्या झोनमध्ये आहे हे काय बघु नका आज रेडझोन मध्ये जवळपास २ लाख लोकवस्ती आहे.आजही अनेक ठिकाणी बांधकाम चालू आहेत आपण काय करतो काही करु शकत नाही. प्राधिकरणाच्या हद्यीतील बांधकाम थांबवली आहेत का? प्राधिकरण म्हणते आमच्या हद्यीमध्ये नाही महापालिका म्हणते आमच्या हद्यीमधील बांधकाम नाही. ३ गुंठयामध्ये ७ मजली बिल्डींगचे काम चालू आहे कोणाचं लक्ष नाही मग शिक्षण क्षेत्रामध्ये तरी कशाला लक्ष घालता. आणि म्हणुन शिक्षण व्यवस्था सुरळीत चालण्यासाठी तातडीने खाजगी मध्ये आपल्या इंटरीव्हचा आपल्याला काय करायचं आहे याचा तुम्हांला स्वतंत्र अधिकार आहे. आणि शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी आम्ही तुमच्या पाठीशी आहे. आणि शाळांमध्ये साफसफाई मात्र लवकरात लवकर करावी अशी विनंती करतो.

**मा.मंगला कदम** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह ,आताचा जो विषय आहे सेक्टर २२ मधील शाळेची इमारत व्यापक स्वरूपात दुरूस्ती केल्यावरच वापरण्यास योग्य आहे, अन्यथा हि इमारत धोकादायक ठरू शकते.आणि त्यासाठी ५० लाखाची तरतुद आहे. पण मगाशी सांगितलं की, त्याठिकाणी हॉस्पिटलची सुध्दा गरज आहे. आपल्याला असं वाटत की,शेजारी इकड,तिकडं हॉस्पिटल आहे आणि मग याठिकाणी काय गरज आहे. खरं म्हणजे गरींबांना जी अत्यावश्यक गरज असते ती तिथल्या तिथं मिळाली पाहिजे.अशा प्रकारच्या सुविधा या शहरामध्ये मिळाल्या पाहिजेत. आज त्या सेक्टर २२ मध्ये भांडण,मारामा-या इतक्या होतात की, त्याठिकाणच्या १०/१२ लोकांची डोकी फुटली जातात. हे त्याठिकाणच्या नगरसेवकांनाच माहिती आहे. त्याठिकाणच्या १०/१२ लोकांची डोकी फुटली तर प्रायव्हेट दवाखान्यात नेणं सोपं नाही. आणि तेथुन वायसीएमएच मध्ये पेशंट आणायचं म्हणलं तरी सोपं नाही. परत आपल्या वायसीएमएच मध्ये जागा शिल्लक आहे की नाही हे माहित नाही. तसेच पुणे जिल्हयातील आजुबाजुच्या गावाचा सगळा लोड वायसीएमएचवर आहे. आणि म्हणुन जसं त्या नगरसेवकाची जशी मागणी आहे त्या सुविधा त्याठिकाणी दिल्या पाहिजेत. आणि या धोकादायक इमारतीची डागडुजी करण्याचा विषय आहे सदरची इमारत ही पुर्वी महापालिकेनेच बांधलेली आहे. तिथली घरे सुध्दा महापालिकेनेच बांधलेली आहेत. आणि त्यानंतर तो डिफेन्सचा नियम बदलला आहे. त्याला आता कोण काय करणार हा विषय याठिकाणी खूप चर्चेचा आहे. रेडझोनची हद्य कमी करण्याचा आपण २००० सालापासून प्रयत्न करतो आहे.पण त्याला फार काही यश आलेलं नाही. परंतु त्याच्यासाठी सुध्दा आपण प्रयत्न करतो आहे. याचा अर्थ सर्वसामान्य नागरीकांना सुखसुविधा या मिळाल्याच पाहिजेत. काही ठिकाणी शाळा खूप चांगल्या आहेत. मोरवाडी सारख्या भागामध्ये महापालिकेची शाळा नाही. त्याठिकाणी एक

,

महापालिकेचा प्लॉट आहे त्याठिकाणी कुठेही महापालिकेची शाळा बांधुन द्या. परवा मी त्याठिकाणी गेले होते तेथे रेनबो शिक्षण संस्था ही दाभाडेची शाळा आहे. ही शाळा लोकांना विश्वास बसणार नाही पण ही शाळा मंदीरामध्ये भरते. त्याठिकाणी कुठल्याही सुविधा नाहीत तरी पटसंख्या जास्त आहे. त्याठिकाणचे शिक्षक खुप चांगले शिकवतात पण त्यांना कुठल्याही प्रकारच्या सुविधा नाहीत. ही शाळा प्रायव्हेट असली तरी मराठी माध्यमाची शाळा आहे. आपल्या महापालिकेची मराठी माध्यमाची शाळा सुरु केली तर त्याठिकाणी इंदिरानगर,लालटोपी नगर, टिपु सुलताननगर असेल किंवा आणखी कुठली आजुबाजुची मराठी शिकणारी जर मुलं असतील तर यांच्यासाठी एक अद्यावत अशी मराठी शाळा चालू करावी. मध्यंतरी शिक्षण मंडळाचे सदस्य आणि आपले अधिकारी दिल्ली महापालिकेची शाळा बघायला गेले होते. महापौर साहेब, आपले अधिकारी अभ्यास दौ-यावर किती वेळा जातात,कुठे,कुठे दौ-यावर जातात.आयुक्त साहेब आम्हांला फक्त एक वर्षाचे शेडयुल द्यावे की, आपले अधिकारी अभ्यास दौ-यासाठी कुठे,कुठे जातात. दौरे नक्की करावेत आम्ही त्या विरोधात नाही. परंतु अधिका-यांचे दौरे दिसत नाहीत. आणि त्याची अंमलबजावणी सुध्दा होत नाही. अधिका-यांनी जर दौरे केले असतील तर पिंपरी चिंचवड मध्ये त्यांनी काय बदल केलेले आहेत. जनरल बॉडी ऍडजेस्ट करुन सर्व अधिकारी दौ-यावर जातात. दिल्लीची शाळा बघुन आल्यानंतर पिंपरी चिंचवडसाठी काय प्रयत्न केलेले आहेत. या अधिका-यांच्या टुरसाठी महापालिकेने किती खर्च केलेला आहे. अधिकारी अभ्यास दौरे करुन आल्यानंतर त्यांनी प्रेस कॉन्फरन्स घेऊन त्याठिकाणची जी माहिती आहे ती कधी सांगितली आहे का? नगरसेवकांना कधी सांगितले आहे का? आजपर्यंत अशी घटना एकदाही घडलेली नाही. शिक्षण मंडळाच्या धोकादायक इमारतीसारखे विषय संपुर्ण पिंपरी चिंचवड शहरामधील इतर ठिकाणच्या धोकादायक इमारतीचे सुध्दा विषय आहेत. आज इमारतीसुध्दा खुप धोकादायक आहेत त्याचा सुध्दा सर्व्हे करणेत यावा. जुन,जुलै मध्ये पाऊस पडणार आहे धोकादायक इमारती कोसळतील तेंव्हा तुम्ही त्यांना कळवलं होतं की नाही हे सगळे प्रश्न उपस्थित होतील तेंव्हा त्याच्या आगोदर या इमारतींचा सर्व्हे करणेत यावा. शहरामध्ये महत्वाचे विषय कोणती आहेत त्यासाठी आपल्या अधिका-यांनी काय केलं पाहिजे. आज आपण रेडझोन मध्ये परमिशन देत नाही पण असे करु नका आज ही इमारत ३० वर्षाची जुनी आहे. मी तुम्हांला सांगु इच्छिते की, आझमभाई पानसरे यांचे वडील नगरसेवक होते त्यावेळेस ही नगरपालिका होती त्यावेळेला इंदिरानगर बांधलेलं आहे. त्या इंदिरानगरच्या इमारतींची अवस्था खुप वाईट आहे.आपण काय करतो एकदा घर बांधुन दिलं त्यांना हॅण्डवर्क केलं की संपलं आम्ही त्यांना पुन्हा इमारत बांधुन देणार नाही. इंदिरानगर झोपडपट्टीतील लोकांना फकीरभाई पानसरे असताना घरे बांधुन दिलेली आहेत. आजपर्यंत त्याठिकाणी कोणत्याही पध्दतीचे कामकाज झालेलं नाही. जर यदाकदाचित त्या इमारतीमध्ये काही दुर्घटना घडली तर त्याला जबाबदार कोण असणार आहे. या सेक्टर २२ सारखाच तो विषय आहे. आपण

,

काय करतो घर बांधतो आणि त्यांना देवुन टाकतो. भाटनगरची सुध्दा तशीच परिस्थिती झालेली आहे. जसं तुम्ही घरकुलला मेंन्टनंन्स साठी सोसायटयांना काढून दिलेलं आहे तस त्याठिकाणी करावे. नाही तर त्या लोकांच्या नावावर जागा करुन द्या ती लोक नवीन इमारती बांधतील. तुम्ही म्हणताय की,एसआरए चा विषय आलेला आहे. तुम्ही धोकादायक असलेली बिल्डींग पाडून नवीन बांधायला घेतली आहे का  तुम्ही ते पण आम्हांला कळायला पाहिजे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या किती तरी इमारती धोकादायक आहेत. चिखली एसटीपी  प्लँन्ट मधील इमारत धोकादायक आहे. त्या इमारतीचं स्ट्रक्चर ऑडीट केलं तर ती इमारत राहण्याच्या लायकीची नाही. तरी सुध्दा त्याठिकाणी जेवढया फॅमिली रहायच्या तेवढया रहातात. कॉर्पोरेशन भाडं घेतं आणि ती लोक त्याठिकाणी रहातात. जर त्याठिकाणी दुर्घटना घडली तर त्याला कोण जबाबदार आहे. आमच्या सारखे जागरुक नगरसेवक त्या भागात जरी असले तरी सुध्दा माझ्यासारखी बाई तिथं बोलणारचं ही इमारत धोकायदायक होती तिचं स्ट्रक्चरल  ऑडिट करायला पाहिजे होतं आपण त्या इमारतीचं भाडं घेतो तरी सुध्दा तुम्ही या धोकादायक  इमारती वापरण्यास कशा काय देता.या शहरामध्ये धोकादायक इमारती कॉर्पोरेशनच्या किती आहेत, खाजगी किती आहेत हे तपासलं पाहिजे. आपण आणलेला विषय चांगलाआहे त्याला आम्ही कधीही विरोध करणार नाही. शाळा,हॉस्पिटल सारखे विषय असतील तर ते झालेच पाहिजे. मगाशी दत्ता साने यांनी सांगितले आहे की, महापालिकेच्या खड्डयामुळे एका महिलेचा मृत्यू झालेला आहे. घरातला एखादयावेळेस पुरुष गेला तरी चालेल पण महिला गेली नाही पाहिजे कारण ती मुलांना धुणं भांडी करुन तरी त्या मुलांना वाढवणार ज्या घरातली बाई जाते त्या घरामधील दु:ख काय असतं ते बघा. रस्त्यावर खडी पडलेली आहे आणि स्मार्ट सिटी म्हणता कसली स्मार्ट सिटी? पिंपरी चिंचवड जर तुम्हांला फिरवलं नसत तर सगळी लोक तुम्हांला नाव ठेवली असती. आयुक्त साहेब,तुम्ही खुप चांगले आहात हुशार आहात हे आम्हांलाही माहिती आहे. तुमच्या कामाची पध्दत खुप चांगली आहे, पण या पिंपरी चिंचवड शहरामध्ये तुम्हांला नेमकं काय झाल आहे हे कळलं नाही आम्हांला सर आम्ही तर तुम्हांला कधी त्रास दिलेला नाही. आम्ही कॉर्पोरेशनच्या हिताचं असल तरच कधी तरी पत्र दिलं आहे. पण तुमच्या बाबतीत असं काय घडलं आहे हेच आम्हाला कळत नाही.या शहराची वाईट परिस्थिती आहे. अनधिकृत टप-या,अनधिकृत सगळं शहर या शहरामध्ये किती कचरा आहे,काय म्हणाल ते याठिकाणी आहे. म्हणजे कुठे काय नाय ते या पिंपरी चिंचवड मध्ये या अशी परिस्थिती झाली आहे. काही,काही शाळा अशा आहेत की, या पिंपरी चिंचवड मध्ये व्हायला  पाहिजेत नेवाळे वस्तीमध्ये शाळा व्हायला पाहिजे. आरक्षण आहे सगळं काही आहे पण  होत नाही. मागच्या वेळेस अशी तक्रार होती की,नेवाळेवस्ती मध्ये एक शाळा आहे त्याच्या जवळच आणखी एक आरक्षण आहे तिथे पण शाळा व्हायला पाहिजे. परंतु त्याच्यानंतर पुढे काहीही झालेलं नाही. शाळेसारखा विषय आहे म्हणल्यानंतर त्याठिकाणी शाळा व्हायला पाहिजे.आजच्या

,

पेपरमधील बातमी भाऊसाहेब भोईर यांनी वाचली की नाही हे माहित नाही.अंडी,फ्रुट बाकी खरेदीचा खुप धमाका काय,काय बरेच आहे. त्या विषयात मला जायचं नाही पण मा.महापौर, अशी जर पेपरची बातमी बघीतली असेल तर मला वाटतं मुलींसाठी,आरोग्यासाठी सॅनिटरी नॅपकीन दरमहिन्याला प्रोव्हाईड केले पाहिजे. एखादया वेळेस फ्रुट देवु नका. गरीब लोक अंडी,फ्रुट सगळं काही खातात. खिचडी देणारी जी महिला आहे ती आठवडयातून एकदा एक बिस्कीट पुडा देते,अंडी देते, असं ब-याच ठिकाणी दिलं जातं हे मी पेपरच्या बातमीनुसार बोलते मी काही शिक्षण समितीवर नाही. परंतु आजची जर बातमी बघीतली तर अशी परिस्थिती आहे. शिक्षण विभागामध्ये ब-याचशा गोष्टीवर धुमाकुळ चालला आहे. कालच माझ्याकडे तक्रार आलेली आहे पण मी त्यावर बोलणार नाही. मला असं मोघम बोलायला आवडत नाही पण हे जे काही शिक्षण समितीवर चाललंय त्याच्यावर कुठं तरी कंट्रोल पाहिजे. मी शिक्षण समितीच्या सदस्यांना विचारलं तुमच्याकडे हे असं काही चाललं आहे का? ते म्हणाले आम्हांला नाही माहित आणि म्हणुन ही जी बातमी आहे काय फ्रुट देता ते आरोग्यासाठी चांगलं आहे पण हे सुध्दा दिलं पाहिजेआणि ते नक्की प्रोव्हाईड केलं पाहिजे.मा. महापौर साहेब,तुम्ही एक महिला आहात तुम्ही मुलींची एक मिटींग घ्या आणि त्याच्यामध्ये हा विषय घेणेत यावा. से.२२ च्या शाळेच नुतनीकरण तर कराच पण महापालिकेची ज्या,ज्या ठिकाणी शाळेसाठी आरक्षणं आहेत त्याच्याकडे लक्ष दिलं पाहिजे. आयुक्त साहेब तुम्ही रेडझोनचा विचार करु नका,रेडझोन प्राधिकरणापर्यंत आहे. म्हणजे काय काम करायचं नाही का? सेक्टर २८ मधील कर्मचा-यांची इमारत सुध्दा धोकादायक आहे. या इमारतीचं ऑडीट इंगळेकडुन करुन घेतलेलं आहे. आयुक्त साहेब आम्ही या सभागृहात येतो बोलतो आणि निघुन जातात असं करु नका आम्हांला सुध्दा काम आहेत. जे संबंधित अधिकारी आहेत त्यांना सूचना देण्यात याव्यात असे सांगते आणि थांबते.

**मा.राजु बनसोडे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह मी प्रभाग समितीमध्ये मुलींची शाळा सकाळी सुरु करण्याबाबत दि.१६/८/२०१६ रोजी पत्र दिलं होतं.हे पत्र देवुन दिड वर्ष झालं याबाबत मी किती तरी वेळा पाठपुरावा केला, किती तरी वेळा निवेदनं दिली, सभा लावल्या अजुन सुध्दा मुलींची सकाळची शाळा सुरु केलेली नाही. मुला/मुलींची एकत्र शाळा असल्यामुळे त्याठिकाणी छेडछाडीचे प्रकार वाढलेले आहेत. मुलींची सकाळी आणि मुलांची दुपारी शाळा चालू करा म्हणुन किती तरी वेळा पाठपुरावा केला, आम्ही त्याठिकाणी पालक सभा लावल्या होत्या तरी सकाळची शाळा का सुरु केली नाही याचा खुलासा करावा. मला खुलासा झाल्याशिवाय मी खाली बसणारचं नाही. मी गेली दिड वर्ष या विषयाचा पाठपुरावा करीत आहे अधिका-यांनी सांगावं की, त्याकडे का दुर्लक्ष केलं आहे. मा.महापौर साहेब, शिक्षण समितीच्या मॅडमची बदली का होत नाही.

**मा.महापौर** – शिक्षण समितीच्या प्रशासन अधिकारी शिंदे मॅडम या सभागृहात नाहीत.

,

**मा.राजु बनसोडे** – मा.महापौर साहेब,त्या असतात कधी हे तरी सांगा. मला खुलासा दिल्याशिवाय मी खाली बसणार नाही अन्यथा मी आंदोलन,मोर्चा काढणार आहे. त्यांना ताबडतोब बोलवून खुलासा करायला सांगा.गेली वर्ष दिड वर्ष झाले तरी त्या रजेवर आहेत,कधी मिटींगला गेल्या आहेत असेच सांगितले जाते. त्यांनी या सभागृहामध्ये कधी उपस्थिती दाखवली आहे.

**मा.महापौर** - शिंदे मॅडम या आजारी असल्यामुळे त्यांना ऍडमिट केलेलं आहे.

**मा.राजु बनसोडे** – मा.महापौर साहेब, शिंदे मॅडम ऍडमिट आहेत तर त्यांचे रिपोर्ट पुढच्या जीबीला आणुन दाखवा. बोलायला संधी दिल्याबद्दल धन्यवाद.

**मा.संदिप वाघेरे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह राजाभाऊंनी ज्योत्सना शिंदे यांच्या बदलीचा विषय घेतला आहे. मागील दोन/अडीच वर्षापासून त्यांच्या बदलीचा विषय आला होता. मी आणि राहूल कलाटे आयुक्त साहेबांकडे बसलो होतो राहूल कलाटेंना शिक्षण विभागाने असं एक पत्र दिलं की, तुम्हांला अशी माहिती देता येत नाही. ऍक्च्युली ती माहिती सगळी कोर्टात जमा आहे. आणि हा विषय आयुक्त साहेब तुमच्या समोर झाला होता. कायद्याने तुम्हांला असे उत्तर देता येत नाही असे ज्योत्सना शिंदे मॅडम म्हणाल्या होत्या. कोर्टात डाक्युमेंट आहे का पब्लिक डाक्युमेंट आहे याची माहिती द्या. आणि या मॅडमची खरोखर बदली करा. ज्योत्सना शिंदे मॅडमची बदली करावी यासाठी किती सदस्य सहमत आहेत. दुसरी गोष्ट आहे की, शाळेच्या इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट केलेलं आहे वास्तविक ही शाळा महापालिकेने ३० वर्षापुर्वी बांधलेली होती त्यावेळेस रेडझोनचा प्रश्न नव्हता. आपण गेली २० वर्षापासून रेडझोनच्या बाबतीत केंद्राकडे फॉलोप करीत आहोत. रेडझोन मध्ये शेतक-यांनी प्रायव्हेट प्लॉटींग करुन बरीचशी घरे बांधलेली आहेत. २०११ च्या आतील रेडझोनमध्ये घरे बांधलेली आहेत ती नियमीत होणार होती. परंतु आजपर्यंत तो विषयाचं घोंगडं भिजत पडलं आहे. प्राधिकरणाचं सुध्दा तसंच झालं आहे त्यावेळेला प्राधिकरणानं जागा ताब्यात घेतलेल्या नाहीत. आज आपल्या महापालिकेच्या ज्या रिर्झेव्हेशनच्या जागा आहेत तिथंही लोकांनी अनधिकृत घरे बांधुन राहिलेले आहेत. आता आपल्या नवीन डीपीमध्ये ते उठवणार आहोत का. भाटनगरचा विषय असा आहे की, या इमारती आपण १९८६ साली बांधलेल्या आहेत आज त्याच स्ट्रक्चर ऑडीट केल तर त्या बिल्डींग पडायला आलेल्या आहेत. तसेच महापालिकेचे कर्मचारी ज्या बिल्डींग मध्ये रहात आहेत ती बिल्डींग सुध्दा ४० वर्षापुर्वी बांधलेली आहे. महापालिकेचे जवळपास ३५ ते ४० कर्मचारी त्याठिकाणी रहातात ती बिल्डींग कधी पडेल हे सांगता येत नाही. दुसरी गोष्ट ड प्रभागातील शाळा आहे २ हजार विद्यार्थी बसतील एवढी मोठी शाळा आहे आज त्या शाळेमध्ये ६० टक्के विद्यार्थी आहेत. म्हणजे आपल्या महापालिकेचा नाकर्तेपणा आहे. २० ते २२ रुम्स आहेत. त्याठिकाणी ४ थी आणि ५ वी चे विद्यार्थी एकत्र बसवतात बाकीचे शिक्षक कुठे जातात. ते काय करतात. आणि विद्या

,

निकेतन जी शाळा आहे मी शिंदे मॅडमला पत्र देवुन पण सांगितलं की, त्याठिकाणी कायमस्वरुपी मुख्याध्यापक नाही टेम्परिरी मुख्याध्यापकाची नेमणुक केलेलीआहे. आणि ज्या महापालिकेच्या शाळा पिंपरी मध्ये आहेत ती कोणत्या तरी बचत गटाला खिचडी पुरविण्याचं दिलेलं आहे ती खिचडी मुलं खात नाहीत,इस्कॉनची खिचडी आपण सर्व मुलांना देत आहोत. इस्कॉनची खिचडी खरंच चांगली आहे. त्याची क्वॉलिटी सुध्दा चांगली आहे. आणि आपण ज्या बचत गटाला खिचडी देण्याचं काम दिलेलं आहे ते बंद करा. आणि जे चांगल आहे ते मुलांना द्या. आणि ज्योत्सना शिंदे यांची बदली करणेत यावी अशी सभागृहाची मागणी आहे. आणि याबाबतचा ठराव मंजुर करावा अशी विनंती करतो.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह आमचे सहकारी संदिप वाघेरे यांनी जी सूचना मांडली आहे त्याला अनुमोदन देतो. कारण गेल्या अनेक दिवसापासून ज्योत्सना शिंदे यांच्या बाबत सन्मा. नगरसेवकांना विचारलं तर अतिशय गोड अनुभव त्यांच्या बाबतीत सर्व सदस्यांना आलेला आहे. सन्मा.सदस्य काम करीत असताना शिक्षणाधिकारी या नात्यानं त्यांच्या प्रभागामध्ये ज्या ज्या शाळा आहेत त्या शाळेच्या माध्यमातून काही सूचना सांगायला गेले तर त्या कधीही जागेवर सापडत नाहीत. त्यांचा फोन नॉट रिचेबल असतो त्यांना एखादं चांगल काम सांगितलं तर ते कधीही मोकळेपणाने सांगण्याचा आपल्याला प्रयत्न केलेला नाही. म्हणुन सन्मा.सदस्य संदिप वाघेरे यांनी ज्योत्सना शिंदे यांच्या बदलीची मागणी केली आहे त्याला मी प्रथम अनुमोदन देतो. आणि माझ्या प्रभागातील शाळा क्र.९०/९१ आपल्या स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांचे मी अभिनंदन करतो की,महाराष्ट्रामध्ये चिखली येथील शाळा क्र.९०/९१ ही शाळा एक नंबर झालेली आहे आणि ती शाळा बघण्यासाठी अनेक ठिकाणाहून लोक येत आहेत. अतिशय भव्यदिव्य अशी शाळा असुन ५ मजली शाळा बांधलेली आहे. पण आयुक्त साहेब,आपण जागेच्या अडचणीमुळे मागच्या बाजुला पुर्ण शाळा ऍक्वायर करता येत नाही. आपल्याला विनंती आहे की, मागची जागा ताब्यात घ्यायची आणि पुढच्या रस्त्याकडनं आपल्याला जागा ताब्यात घ्यायची तिथल्या रस्त्याची अडवाअडवी होत आहे. तेंव्हा लवकरात लवकर शाळा ताब्यात घेऊन २६ जानेवारीला १ ली ते ७ वी पर्यंतचा विद्यार्थी बसावा अशी तुम्हांला विनंती करतो. आणि शाळेचा कारभार सांगत असताना आतापर्यंत तुम्ही ऐकलं असेल की,या शाळेला गणवेष,बुट,रेनकोट पुरविले जातात पण ते कधी पुरविले जातात हिवाळा असेल तर रेनकोट दिले जाते, शाळा सुरु होऊन सुध्दा त्यांना ६/६ महिने वह्या,पुस्तके दिली जात नाहीत. हे असले प्रकार त्या शिक्षण विभागामध्ये सध्या चालू आहे. आपण महापालिकेच्या शाळा चांगल्या प्रकारे चालवतो सर्वसामान्य गोरगरीबांची मुले त्या शाळेमध्ये जात असतात त्यांच्या भवितव्याचा विचार करुन आपण त्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना ज्या काही सोयी सुविधा देतोय त्याची कालमर्यादा ठरविणेत यावी. विद्यार्थ्यांना पावसाळयात रेनकोट द्यायचं असत त्यावेळेस त्यांना स्वेटर दिले जाते. तेंव्हा

,

हा या विभागामध्ये अनागोंदी कारभार चालू आहे. म्हणुन आपल्याला विनंती आहे की, रेडझोन मध्ये महापालिकेला काम करता येत नाही, मग तुम्हांला त्या नागरिकानी टॅक्स भरलेला चालतो,पाणीपट्टी भरलेली चालते. जर तुम्हांला सुविद्या द्यायच्या नसतील तर आमचा टॅक्स बंद करावा. आमची अनधिकृत बांधकाम का पाडता आहात. मी रेडझोन मधील असलेल्या नगरसेवकांना आव्हान करतो की, त्यांनी आपला टॅक्स आणि पाणीपट्टी भरु नये. कारण आम्हांला महापालिका सुविधा देणार नसेल तर टॅक्सही भरणार नाही. सेक्टर २२ मध्ये रेडझोनाचा प्रश्न आता निर्माण झालेला आहे. रेडझोन कोणी आणला,कसा आला हे पण आम्हाला माहिती आहे. कायद्याच्या चौकटीमध्ये सगळया बाबी चालू आहेत भविष्यात काय निर्णय होईल तो होईल. पण त्याठिकाणच्या नागरीकांना मुलभूत सुविधा देणे हे आपले आद्यकर्तव्य आहे. म्हणुन माझी विनंती आहे की, त्या प्रभागामध्ये विकास कामे झाली पाहिजेत. आज त्या शाळेच्या अनुषंगाने हे विषय निघालेले आहेत. आज त्या शाळेची इमारत पडुन विद्यार्थी दगावले तर त्याला कोण जबाबदार राहणार आहे. महापालिकेने शाळा बांधलेली आहे आणि त्यानंतर रेडझोनचा प्रश्न निर्माण झालेला असेल तर त्याची जबाबदारी आपलीच आहे नां त्याठिकाणी बिल्डींग महापालिकेची आहे, ती तेथुन काढायची का माजी नगरसेवक खाडे याठिकाणी ओरडून,ओरडून गेला त्या भागातील विकास कामासाठी,त्या भागातील शाळेसाठी ओरडत होता. महापौर साहेब,आपल्याला विनंती आहे की, आपण आयुक्तांना आदेश द्यावेत की, कोर्टाचा आदेश ज्यावेळेस होईल तो होईल पण त्याठिकाणी ज्या नागरी सुविधा आहेत त्या देण्याचं काम करावं आणि चिखली येथील शाळा क्र.९०/९१ या शाळेचा २६ जानेवारी २०२० स्वतंत्र शाळेचा कार्यक्रम व्हावा. त्यासाठी त्याठिकाणी उर्वरित जी कामे आहेत ती त्वरीत करणेत यावी. अशी विनंती करतो.धन्यवाद.

**मा.अभिषेक बारणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह ही जी इमारत आहे ती ३० वर्षापुर्वीची आहे. या इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट केल्यानंतर ती दुरुस्त करण्यासाठीचा विषय आलेला आहे. ज्यावेळेस या इमारतीचे काम झालेले आहे त्यावेळेस त्या इमारतीचे लाईफ हे ५० वर्ष असावे,१०० वर्ष असावे या पध्दतीने त्यावेळेस काम केलं गेलं नव्हत का याचा देखील आपण विचार करणं गरजेचं आहे. त्या काळात जो संबंधित ठेकेदार होता त्याचा कोणी तरी वारस असेल आणि तो काम करीत असेल. अशा लोकांना देखील काही फाईन लावता येतो का याचा देखील विचार करणेत यावा. राहीला प्रश्न या बिल्डींगच्या कामाबद्दलचा पण याठिकाणी आयुक्तांनीच हा विषय ठेवलेला आहे. म्हणजे आयुक्त साहेब देखील रेडझोनमधील कामासाठी प्रयत्न करीत आहेत. विषयाला धरुन सर्वानी बोलावं तसेच दुसरं असं की,महापालिकेच्या शाळेमध्ये जी विनाअनुदानीत शाळेतील मुलं आहेत आणि अनुदानीत शाळा अशी दोन पध्दतीची तुकडी वाढल्यानंतर आपल्याला मुलं वाढतात, वर्ग वाढतात, वर्ग वाढल्यानंतर आपल्या महापालिकेच्या हद्दीमधील ६ ते ७ हजार मुले अशी असतील की ज्यांना आपण खिचडी देत नाही.

,

थेरगांव शाळेमध्ये मी गेल्यानंतर असे निदर्शनास आलेलं आहे की, एका पंक्तीतत १० मुलांना जेवण देतो १० मुलांना देत नाही.ख-या अर्थानं ही मुले गोरगरीब आहेत यांना आपण सरसकट ज्या पध्दतीने विनाअनुदानीत विद्यार्थ्यांना देखील दप्तर,गणवेश,वहया पुस्तके देतो अशाच पध्दतीने  त्यांना आपण खिचडी देण्याचं देखील नियोजन करणं गरजेचं आहे. आणि ते केल्यानंतर आयुक्त साहेबांशी चर्चा केल्यानंतर तशा त्यांनी सूचना देखील केलेली आहे जेवढया लवकरात लवकर तुम्हांला करता येईल तेवढा तुम्ही प्रयत्न करावा. एवढंच सांगतो आणि थांबतो.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह  याठिकाणी आपण M/s KBP Civil Engineering Services यांचेकडून Structrul Audit करुन घेण्यात आलेलं आहे. आयुक्त साहेब,माझी आपल्याला विनंती आहे की, आणि ब-याच जणांनी विषय मांडलेला होता की, महापालिकेचाच स्ट्रक्चरल इंजिनियर असला पाहिजे. मला वाटतं हे पद आपल्याकडे मंजुर आहे. आता या बिल्डींगचं जसं स्ट्रक्चर ऑडीट केल आहे तस सगळयाच बिल्डींगच स्ट्रक्चरल ऑडीट केलं पाहिजे. अभिषेकनी विषय खुप चांगला मांडलेला आहे ज्यावेळेस बिल्डींगचे काम करतो त्यावेळेस त्या बिल्डींगचे लाईफ हे ५०,१०० वर्ष असले पाहिजे. असे गृहीत धरुन त्या बिल्डींगचे स्ट्रक्चरल डिझाईन केलं जातं आणि सगळी काम त्या पध्दतीनं केली जातात परंतु आता या इमारतीचं ३० वर्षा मध्येच स्ट्रक्चरल ऑडीट केलेलं आहे आणि ही  इमारत दुरुस्त करण्याची किंवा नव्याने बांधण्याची वेळ आलेली आहे. त्यामुळे येथून पुढच्या काळामध्ये असे होऊ नये महापालिकेच्या ज्या टाक्या ,इमारती बांधल्या जातात तेंव्हा आपला स्वत:चाच इंजिनिअयर असेल तर  जास्तच योग्य राहील आणि त्याच लाईफ किमान १०० वर्षाचे असले पाहिजे असे प्लॅनिंग केले पाहिजे. आणि त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड शहरातील सर्व इमारतीचे,पाण्याच्या टाक्यांचे स्ट्रक्चरल ऑडीट केल गेलं पाहिजे. दुसरी गोष्ट भोसरी येथील शाळेच्या बाबतीत निदर्शनास आणुन द्यायचीआहे की, भोसरीच्या शाळेचं स्ट्रक्चरल ऑडीट केलं गेल आणि त्याही ठिकाणी ती इमारत पाडून नव्याने बांधण्याचा ठराव झाला आणि त्या पध्दतीने पुढे प्रोसेस करायची. परंतु आता जी शाळा आहे ती रिकामी होऊन तिथल्या काही शिक्षकांना ४/५ खोल्या अटॅच आहेत त्यांची ब-याच दिवसापासून मागणी आहे की, त्या खोल्या आम्हाला उपलब्ध करुन देणेत याव्यात. परंतु त्या उपलब्ध होत नाहीत. प्रभाग समितीच्या बैठकीमध्ये अनेक नगरसेवकांनी हा विषय मांडला परंतु त्याला सोल्युशन मिळालं नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, प्रशासनाने त्याच्याकडे लक्ष घालावं.  आणि त्याठिकाणच्या ४/५ खोल्या उपलब्ध करुन देण्यात याव्यात आणि ती इमारत ताबडतोब पाडून नव्याने इमारत बांधायला घ्यावी. कारण उद्या जर का काही घटना घडली तर फार महागात पडेल तेंव्हा आपल्याला विनंती आहे की, त्याठिकाणी त्वरीत लक्ष घालावं आणि रेडझोनच्या बाबतीत सांगायचं झाल तर त्याठिकाणचे नागरीक सुध्दा आपल्याकडे  टॅक्स भरतात त्यांनाही सुविधा देण्याची गरज आहे. आणि या

,

विषयावर अनेकांनी मतं मांडलेली आहेत त्यामुळे अधिक वेळ घेणार नाही जस आपण शाळेच्या बाबतीत भूमिका घेतलेलीआहे तसंच इतर विकास कामांच्या बाबतीत सुध्दा भूमिका घेतली तर तिथल्या नागरीकांना न्याय मिळाल्यासारखं होईल धन्यवाद.

**मा.कुंदन गायकवाड-** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह आमच्या प्रभाग क्र.१ मध्ये शाळेचं काम झालं सगळयात मोठी शाळा आमच्या भागात झाली. त्या शाळेचा कालावधी किती आहे हे तुम्ही त्या ठेकेदाराला सुध्दा बोलवून विचारलं पाहिजे होतं त्याला काही दंड लावला पाहिजे. आम्ही ती शाळा ताब्यात घेण्यासाठी शिंदे मॅडमला घेऊन ती शाळा आता ताब्यात घेतलेली आहे. ती शाळा ५ मजली आहे. एवढी मोठी शाळा असुन त्या शाळेला ग्राऊंड नाही. त्या शाळेतून आंतरराष्ट्रीय खेळाडू घडलेले आहेत आणि त्याच शाळेला ग्राऊंड नाही. आणि त्या शाळेची मुले आणि मुलींची सगळयात मोठी पटसंख्या आहे. त्या शाळेची पटसंख्या कमी पडत होती म्हणुन बांधकाम केलं शाळेचं लिफ्टचे काम थांबलेलं आहे ते लवकरात लवकर चालू करावे. स्थापत्य आणि इलेक्ट्रीकच्या विभागाने लिफ्टचे काम लवकरात लवकर सुरु करावे. रेडझोनमध्ये काही वस्त्यामध्ये घरे झालेली आहेत. त्याठिकाणी अमृत योजनेची पाईपलाईन टाकलेली आहे. काही ठिकाणी ती लाईन पूर्ण झालेली आहे.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे-** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह खरं तर अत्यंत चांगला विषय आहे. रेडझोनमध्ये जरी शाळा असली तरी ती ज्ञानमंदीर आहे न्यायदानाचं काम ज्या ठिकाणी केलं जातं अशा इमारतीसाठी जो काही खर्च लागणार आहे अनेक अटी/शर्ती आहेत त्या बाजुला ठेवुन आपण काम करावं अशी आपल्याला विनंती करते. परंतु त्याचबरोबर ती शाळा आपण कधी बांधली या शाळेचं बांधकाम कोणत्या साली केलं आणि कोणतीही शाळा बांधल्यानंतर त्याची डेडलाईनचा उल्लेख याठिकाणी केला पाहिजे. याची अंमलबजावणी आजही केली नाही. महानगरपालिकेच्या काळात ज्या इमारती बांधलेल्या आहेत त्या धोकादायक झालेल्या आहेत. मग आपण चांगले काम करुन घ्यायला अकार्यक्षम होते का? महानगरपालिकेची १९८२ सालची स्थापना आहे. ८२ साली आपण लगेच काही इमारती बांधलेल्या नाहीत. तेथून पुढे ७,८,१० वर्षानंतर इमारती बांधलेल्या असतील. साधारण ९२ ते ९५ सालच्या काळात इमारती बांधलेल्या असतील त्यातल्या अनेक इमारती धोकादायक झालेल्या असतील तर त्याच्याबद्दल भितीचं वातावरण निर्माण झालं असेल,अपघात होण्याची शक्यता वाटत असेल,अशा वेळी आपण ठरवून घेतलं पाहिजे की,इमारत बांधताना त्याचा शेवट कधी आहे. हे सुध्दा आपण याठिकाणी नमुद केलं पाहिजे.माझ्या प्रभागातील हॅरीस ब्रीज ज्यावेळेस धोकादायक झाला होता त्यावेळेस ब्रिटीश लोकांकडुन पत्र आलेलं होतं की, हा ब्रीज धोकादायक झालेला आहे म्हणजे त्यांनी काय विचार केलेला आहे याचा विचार करा की, इतकी लोकसंख्या वाढली,इतक्या इमारती वाढल्या,इतकी वाहनं वाढली आणि त्यानंतर हा ब्रीज धोकादायक होऊ शकतो. आणि तो पडायच्या आत त्यांनी आपल्याला कळवलं हा त्यांच्याकडे दूरदृष्टी

,

होती पण आपण निश्चितपणे काय करतो आहे. याची आम्हांला माहिती आलेली आहे. आता अनेकजण बोलताना म्हणले की, शिक्षकांच्या आपण ज्या बदल्या करतो तो जवळच होतात. हे फक्त शिक्षकापुरतेच नाही आपण शहरामध्ये एकदा पहा आपले कर्मचारी हे कामाला कुठे आहेत हे कर्मचारी अजिबात वॉर्डातली वॉर्डात कामाला ठेवु नका. अशी विनंती करते. आपण काय कोणावर राखण नाही पण प्रभागात असले की,कोण चहा पिण्यास जातो,कोण जेवायला जातं,कोण वैयक्तीक कामाला जातं. आपले सर्व नगरसेवक चांगले आहेत म्हणुन आपण आपल्या कर्मचारी/ अधिका-यांना सांभाळून घेतो. परंतु आपण एखादया अधिका-याल विचारलं की,कुठे आहात तर ते पटकन सांगुन जातात तर तो खरेपणा आपण मान्य केला पाहिजे. त्यांना दोषी धरावे असं अजिबात नाही. पण चुकुन जर एखादा अपघात झाला तर जबाबदारी कोणाची असे अनेक प्रश्न निर्माण होतात.सन्मा.आयुक्त साहेबांनी सांगावं की, इमारत कधी बांधली आणि त्याला किती वर्ष झाली आहेत इमारत बांधल्यानंतर आरसीसी बांधकाम किती वर्ष टिकलं पाहिजे. याची माहिती द्यावी ही विनंती करते.

**मा.विकास डोळस** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह विषय क्रमांक २ सेक्टर २२ मधील शाळेचे स्ट्रक्चरल ऑडीट झालं आणि ३० वर्षामध्येच ती इमारत धोकादायक झाली अशा प्रकारचा  अहवाल आलेला आहे. महापालिकेने बांधलेल्या इमारतीचे आयुष्य ३० वर्ष आणि खाजगी इमारत बांधली तर त्याचे आयुष्य १०० वर्ष जातं आशाताईने जे सांगितले आहे की, ब्रिटीश कालीन जे पूल आहेत त्याची लाईफ १०० ते १५० वर्ष असते तिकडुन आपल्याला पत्र येतात आणि आपल्या पालिकेची ३० वर्ष झालेली इमारत ही धोकादायक होते. तर याची सखोल चौकशी करायला पाहिजे. दुसरं भाऊसाहेब भोईर यांनी सांगितलं आहे की, आता ती शाळा रेडझोनमध्ये आहे आणि आपल्या पालिकेच्या अंतर्गत शाळा असल्यामुळे थोडंस नियमबाह्य जाऊन काम करायला लागलं तर पालिकेच्या अधिका-यांकडुन काम होत नाही असं नाही. दत्ताकाकांनी सांगितलं की, खड्डयामुळे एका भगिनींचा मृत्यू झाला आहे. तेंव्हा आपले अधिकारी उत्तर द्यायला हुशार असतात,टोलवा टोलवी करायला हुशार असतात आणि जर एखादी शाळा नियमबाह्य बांधली तर त्याठिकाणी सुध्दा टोलवा टोलवीची उत्तरं दिली तरी बरे होईल. किंवा नगररचना विभाग एकदम हुशार आहे म्हणजे जसे पुररेषा, दोन,दोन पुररेषा दाखवितात. तसं रेडझोनची पण कमी हद्द दाखवतील. त्यांच सहकार्य घेतलं तर त्या शाळेच काम होईल. नियमबाह्य का होईना पण त्या शाळेचं काम करावे. गरीब,दलीत,वंचित अशी मुले महापालिकेच्या शाळेत येतात मुळात आपण बघितलं तर महापालिकेचा जो वर्ग आहे तोच सर्वात शेवटचा वर्ग आहे. आणि तीच मुलं आपल्या शाळेमध्ये येतात आगोदरच्या अनेक नगरसेवकांनी बोलले आहे की, शिक्षकांची मुलं त्या शाळेमध्ये येत नाहीत. मी पण पालिकेच्या शाळेचा विद्यार्थी आहे. पण मला वाटले नाही की, पालिकेच्या शाळेत टाकावं याची कारणं वेगवेगळी आहेत. आयुक्त साहेब, आपले अधिकारी दिल्लीच्या दौ-यावर गेले होते. दिल्लीमध्ये

,

महापालिकेच्या शाळेने जे धोरण राबविलेले आहे सरकारी शाळा पण प्रायव्हेट शाळेच्या तोडीस होऊ शकतात. हे त्यांनी दाखवून दिलं आणि आज त्याची गरज आहे. सामान्य माणसांसाठी शिक्षण ही जहागीरी आहे जो वंचित आहे त्याला एकच जहागिरी आहे त्याला पुढं जाऊन एकच विकास करायचा असेल तर ते म्हणजे शिक्षण आणि त्या शिक्षणाच्या जोरावरचं त्याचा विकास होऊ शकतो. आणि आज आपल्या देशामधील शिक्षणाची परिस्थिती बघीतली तर कोणी आयसीसी बोर्डात टाकतो कोणी सीबीएसई बोर्डात टाकतो. आणि ज्याचं वजन वरती आहे तो इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकतो, आणि ज्याची परिस्थिती चांगली नाही तो विचार करतो की, सरकारी शाळेमध्ये टाकावं, पालिकेच्या शाळेमध्ये टाकावं आपण सरकारी शाळा आणि खाजगी शाळा यांची तुलना केली तर आपलं इन्फ्रास्ट्रक्चर आणि त्यांच इन्फ्रास्ट्रक्चर हे त्यांच्यापेक्षा किती तरी पटीनं आपलं चांगलं असतं आज आमच्या प्रभागामध्ये १५ कोटीचं शाळेचं काम चालू होत आहे. आणि प्रायव्हेट शाळेच्या बिल्डींग बघितल्या तर एक बिल्डींग दोन/तीन मजल्याची असते आणि तिथं ८/९ वर्ग केले जातात आणि तिथं ऍडमिशन विचारलं तर नो ऍडमिशन म्हणुन बोर्ड फुल्लं लावले जातात. या परिस्थितीचा आपणही विचार केला पाहिजे. मुळात आपले जे शिक्षक आहेत, शिक्षण विभागातील जे शिक्षक आहेत तेच मुळात किती शिक्षणाच्या बाबतीत सिरीएस आहेत याची कारणमीमांसा करणं गरजेचे आहे. नगरसेवकांनी कितीही मनावर घेतलं की, शिक्षण विभागाचा दर्जा सुधारला पाहिजे. तर खरी जबाबदारी ही प्रशासनाची आहे. शिक्षकांची आहे, आपल्या शाळेचा दर्जा सुधारला पाहिजे, आणि त्या दृष्टीने या प्रश्नांकडे बघितलं पाहिजे. आयुक्त साहेब, शिक्षण हा समाजाच्या आणि पालिकेच्या दृष्टीने खूप मोठा विषय आहे. या विषयाकडे आपण अतिशय गंभीरतेने बघितलं पाहिजे. आणि त्या हिशोबानेच त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. आपल्या पालिकेचे शिक्षक हे ५० ते ८० हजार पगार घेतात आणि आपण शाळेमध्ये व्हीजीट केली तर जास्तीत जास्त शिक्षक हे मोबाईलवर व्यस्त असतात तर कोणी चहा प्यायला गेलेले असतात,एकत्र बसुन गप्पा मारीत असतात, पाठीमागे आपल्या राहुलदादांनी प्रत्येक शाळेला व्हीजीट केली त्यानंतर गुणवत्तेमध्ये थोडी सुधारणा झाली पण नगरसेवक,महापौर हे पूर्ण काळापर्यंत नसतात हे तात्पुरते असतात पण प्रशासनाकडुन कोटेकोरपणे गुणवत्तेबाबत व्हीजन केलं पाहिजे. आणि त्याची अंमलबजावणी मुख्याध्यापक, शिक्षकांकडुन व्हायला पाहिजे. या गोष्टीची आपण दखल घ्यावी. अधिका-यांनी दिल्ली गर्व्हेमेंटची टूर केली त्या गोष्टीची अंमलबजावणी केली पाहिजे धन्यवाद. जयहिंद,जयमहाराष्ट्र.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह सगळयांच्याच भावनांशी सहमती दर्शविणं एकमेकांच्या बरोबर काम करीत असताना कामामध्ये कुठे व्यत्यय येणार नाही याच्यासाठी आम्ही दक्ष असतो. ५० लाख, ५ कोटी या आमचं काहीच म्हणणं नाही. परंतु ते देत असताना, काम करीत असताना विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुध्दा

ठरवणं सुध्दा महापालिकेचं काम आहे त्यासाठी आपण स्पेशल अधिकारी नेमलेले आहेत त्यांच त्या संदर्भात त्या शाळेवर किती लक्ष आहे. स्ट्रक्चरल ऑडीट करायचं सवणे साहेब तुम्हांला आशाताईंनी आणि अनेक नगरसेवकांनी खुलासा मागितला आहे.कमिशनर साहेब, ही शाळा कधी बांधली होती. आता हे कसं झालं माहिती आहे का मागचे सत्ताधारी होते आता विरोधक आहेत त्यांनी आता टिका केली की, आम्ही म्हणणार की,तुम्ही बांधलेली ३० वर्षापुर्वीची बांधलेली शाळा ती धोकादायक ठरु शकते. किती चांगलं काम केलं होतं, नव्हतंच चांगल काम केलं, आणि म्हणुन तर आता दुरुस्ती करण्याचा विषय आहे. आणि आता एकाच शाळेचं नाही तर अनेक सदस्यांनी सांगितलं आहे की,या इमारतीचं स्ट्रक्चरल ऑडीट करा, त्या इमारतीचं करा, त्या इमारतीचं करा... आता ज्यांनी,ज्यांनी आमच्यावर टिका केल्या आहेत त्यांनी आता सगळयांनी सांगावं की, आपण मागं काय केल होत. याच शहराचा विकास करताना राडारोडयाचा विषय दत्ता काकांनी काढला एका महिलेचा दुर्दैवी अंत झाला. काका मी त्या महिलेच्या दुःखामध्ये मी पूर्ण सहभागी आहे. विषय काय आहे की,वारंवार तुमचं लक्ष या सभागृहात सत्ताधारी पक्षाचे असताना सुध्दा आम्ही तुमच्यावर टिका करण्यास घाबरलो नाही,की डगमगलो नाही किंवा कोणती पार्टी आमच्यावर कारवाई करील याची सुध्दा आम्ही भिक घातली नाही. हे का करायचं साहेब, माणुस मेला आणि पैसे घेऊन काही केला जीव परत येत नाही म्हणुन तुम्ही पूर्व काळजी घ्यावी या मताचे आम्ही आहोत.  नाही, घेतात आपल्या अधिका-याचं काय होतय मी नाही काम केलं दुस-यानी बघा, दुस-यांनी म्हणायचं तिस-यानी का नाही त्याठिकाणी तत्परतेनं सांगितलं की,साहेब तुम्ही टेंन्शन घेऊ नका हे काम कोणी केलं,कसं केलं जे काही असेल जबाबदारी ही निश्चिचतपणे महानगरपालिकेची आहे.महानगरपालिका स्वत: जबाबदारी घेते आणि ज्यादिवशी आपले अधिकारी  काम करतात त्यानंतर याठिकाणी सत्ताधारी पक्षाला जबाबदार धरले जाते आणि काय म्हणुन आम्ही जबाबदारी उचलायची,योग्य पणे उत्तर देण्याची जबाबदारी कोणीच होती. ज्यांच्या घरी अपघात झाला का,मृत्यू झाला त्यावेळेस यांना फोन केल्यानंतर यांनी काय उत्तर दिलं आहे. स्मार्ट सिटीच्या नावाखाली खोदकाम चालू आहे सगळीकडे राडारोडा चालू आहे,रस्त्याची कामं अफाट चालू आहेत या तीन वर्षामध्ये जर का आपण पाहिलं तर मागच्या तीन वर्षाचं रेकॉर्ड ब्रेक करुन आताच्या तीन वर्षामध्ये कामं चालू आहेत.येत्या दोन वर्षामध्ये हे संपुर्ण शहर नवीन शहर जनतेच्या नजरेतून येणार आहे.मुंबई मध्ये काम झाल्यानंतर राडारोडा जसा उचलला जातो तसं आपल्याकडे होत नाही. कारण आपल्याकडे सब कॉन्ट्रॅक्टरची इतकी वाईट पध्दत  चाललेली आहे की,त्याच्यावर कोणाचंही कंट्रोल नाही. मगाशी भाऊसाहेबांनी टिका केली ज्यांनी,ज्यांनी टिका केली त्यांनी नाव घ्यायला काय होतं जर तुम्हांला टिका करायची असेल तर अजुन करा समोर कोण काम करतोय त्याच्याकडुन दुरुस्ती करुन घ्या. ताकाला जायचं भांड माग लपवायचं आणि टिका तर करायची टिका अशी हळुच हाणलं आणि मी काय म्हणलं अशी कुठं काय टिका असते का? कशी टिका

,

करायची ती अभ्यासपूर्वक करा कोणी काम केलं,कसं काम केलं, कॉन्ट्रॅक्टर कोण आहे,तिथं काम कोण करतो,कोण जबाबदार आहे काहीच नाही. पत्रकारांनी शोधायचं,त्यांनी छापायचं त्याच्यावरती टिका करायची याला काय अर्थ आहे का? आम्ही पण टिका केल्या आहेत पण आम्ही कागदोपत्री पुराव्यानिशी टिका करीत होतो. तुमच्या टिकाचं आम्ही मनापासून आदर करतो.टिका केल्यानंतर निश्चितपणे माणसाला सुधारण्याची संधी मिळते. म्हणुन आम्ही त्या टिकाचा आदर करतो. आणि म्हणुन महापौर साहेब,आम्ही याठिकाणी रेडझोन आणलेला आहे का? २०११ चा मुंबईवर जो हल्ला झाला त्यानंतर माझं पिटीशन लागलं १६ तारखेला पहिल्याच वेळेला तिथेच लागलं आम्ही नाही आणलं, ज्यांना या देशाचे जाणता राजा म्हणतात ते आदरणीय मा.शरदचंद्रजी पवार साहेब संरक्षणमंत्री होते त्यावेळेस सुध्दा या रेडझोनचा प्रश्न होता त्यावेळेसही हा व्याप काही कमी झालेला नाही.खुप प्रयत्न केले. सगळया राजकीय राजवटीमध्ये प्रयत्न केले गेले.आता त्याठिकाणी मुळात हे समजुन घेतलं गेलं पाहिजे ज्याठिकाणी हे डेपो आहे त्याठिकाणी किती ऍम्युनिशन आहे त्याच्यावरती त्याच यार्ड ठरलेलं असतं. आणि त्याठिकाणी एक महत्वाचा मुद्या असा होता की, त्याठिकाणी अनेक बोगस लाभार्थी पण घुसवले होते. आपणच पोलीस कम्पलेन केलेली आहे,फौजदारी गुन्हा दाखल केलेलाआहे. त्यामुळे त्याठिकाणचे जे भूमीपुत्र होते. महानगरपालिकेसारखी एक जबाबदार संस्था त्याठिकाणी जे स्वत:साठी नियम असतात त्या नियमांची पायमल्ली करुन ते प्रकल्प कसं राबवतील. संविधानाची पायमल्ली करतात, सगळया झोपडपट्टया एकत्र आणतात,तिथं राहिलेल्या गुंडगिरीवर कोणाचा वचक नाही, आणि जे पात्र होते त्यांना घर मिळालं नाही आणि वर म्हणतात १ लाख रु.द्या तुम्हांला पात्र करुन घेतो. जे नव्हते ते पात्र झाले आहेत. आयुक्त साहेब,याची हिस्ट्री बघा या रेडझोनवरती ख-या अर्थानं अभ्यास करण्याची त्यावेळच्या तत्कालीन सभागृहाची जबाबदारी होती. ज्यावेळेस नोटीफिकेशन आलं त्यावेळेस कोणीच ऑब्जेक्शन घेतलं नाही. माहितच नव्हतं अनेकांना माहित होतं. त्यावेळचे आयुक्त आशिष शर्मा यांना पत्र लिहीलं होतं डीयर आशिष त्याठिकाणी दारु गोळा इतका स्फोटक आहे की, जर त्याठिकाणी नॅशनल अटॅक झाला तर ४० कि.मी.चा परिसर उध्वस्त होतो आणि पुढच्या ७ पिढया अंध,अपंग होऊ शकतो. असं पत्र आहे. रेडझोनमध्ये प्रकल्प कोणी राबवला,महापालिकेने त्याठिकाणी प्रकल्प राबवला मग हा प्रकल्प फ्री करा, नाही करु शकला, मग तुमच्यासाठी वाटेल ते, आणि ज्यांच्या हजारो एकर जमीनी आहेत त्यांच काहीच करु शकत नाही त्यांची कोण भरपाई देणार.त्यांच म्हणणं काहीच नव्हतं आपल्याकडं, याचिका दाखल केल्यानंतर त्याच्यावर कुठं तरी रेस्ट्रीक्शन आलं म्हणण्यापेक्षा कोर्टानी त्याला टीडीआर दिला होता. आज त्या इमारती घ्यायच्या का नाही घ्यायच्या म्हणजे एखाद्यावेळेस रेडझोन कमी झालं किंवा शासनाने कळवलं हायकोर्टाने जर का तसा निर्णय केला तर निश्चितपणे तुम्हांला मला शेअर द्यावा लागेल एखादया नियमाला आव्हान द्यायचं असेल तर कोणी तरी शेर झालं पाहिजे नां हे किती दिवस

आळीमिळी गुपचिळी चालू आहे. आणि म्हणुन आम्ही याचिका दाखल केली,रेडझोन काय आम्ही घरातून आणलां काय माझ्या आगोदर एक याचिका दाखल केली होती. त्यांची याचिका आणि माझी याचिका तयार केली कोर्टानी मिल्ट्रीचा जो अधिकारी होता त्याला तर सजा झालेली आहे. साहेब, फार मोठी हिस्ट्री आहे. आता शाळेच्या संदर्भात सर्वांनीच बोलले आहे. ज्योत्सना शिंदेची बाजु आम्ही जितक्या ताकदीने घेत होतो आम्ही एक महिला म्हणुन आमची सर्व महिला अधिका-यांना विनंती आहे की, त्यांनी सुध्दा काम करायला कुठं कमी पडायला नाही पाहिजे नां. त्या फोन उचलत नाहीत हे १०० टक्के खरं आहे त्या बघतात नगरसेवक किती ताकदवान आहे,कसा आहे आणि मग फोन करतात. आपण म्हणलं त्यांना फोन नाही घेतला कुठं होता,ताई आज डोकं दुखत होतं, पुन्हा फोन केला मॅडम आज फोन केला होता फोन नाही घेतला,नाही ताई आज पोटात दुखत होतं. रोजची कारणं कशाला,रोजची कारणं ऐकुण कंटाळा आला नां आम्ही शिक्षण मंडळात कधीच फोन करीत नव्हतो. मा.संतोष पाटील साहेब, शिक्षण मंडळ तुमच्याकडेच आहे नां हा काय नवीनच पायंडा पाडलेला आहे. आणि त्याठिकाणी आपण सुध्दा जे,जे कोणी कॉन्ट्रॅक्टर होते रोज आम्ही त्याच्याबरोबर असतो,जे काही असतो त्याच्यामध्ये असं काही घुसडण्याच कारण नाही की,आम्ही सत्ताधारी आहोत म्हणुन आमच्यावरच टिका करतात. काही गोष्टी १०० टक्के ख-या पण आहेत.म्हणुन त्याच्यावर तुम्ही अंमलबजावणीच करणार नसाल आणि पाठीशी घालण्याचं काम चाललं असेल तुमच्या शाळेमध्ये इतके विद्यार्थी आहेत आणि मग त्या विद्यार्थ्यांचं ड्रेस,रेनकोट,बुट,दप्तर,वह्या,पुस्तकं आहेत ही सगळी खरेदी झालेली आहे तुमची आता काय नवीन आणि आता नवीन खरेदी केलेली वाया गेली ८५ लाखांच्या वह्या घेतल्या होत्या. तुम्ही सांगितले छोटयाशा रुममध्ये शाळा चालवत होते आणि मग इतकी वर्ष विद्यार्थ्यांना शिक्षक शिकवत होते का? त्यांच्यावर कारवाई करण्याची गरज आहे. हे किमान प्रशासनाने तपासलं पाहिजे. आम्ही नगरसेवक आहोत आम्ही कागदोपत्री कुठंच सापडणार नाही. सापडणार तुम्ही आहात, तुम्ही तुमचं बघायचं खुर्ची कशी वाचवायची आणि तुमच्यासाठी आम्ही आमचं करियर खराब करुन घेणार नाही. योग्य काम करा,नाही पटलं तर शेरा मारा मिटींग घ्या मिटींगमध्ये डायरेक्ट सांगा होत नाही म्हणुन पण हे तुमच्याकडनं होतच नाही. माहितीच्या अधिकाराखाली ही माहिती देता येत नाही म्हणुन कोणी सांगितलं उगाच आपलं उचलली जीभ लावली टाळुला योग्य नाही नां माहितीच्या अधिकारा खाली तुम्हांला माहिती द्यावीच लागेल. कोर्टाचे जे नियम आहेत तेच नियम तिकडे आहेत आणि मला दिली आहे नां मी अनेक फाईली केलेल्या आहेत. हायकोर्टात केसेस पेंडींग असताना,शासनाचे निर्णय प्रलंबित असताना, मला त्यांनी नाकारलेलं आहे माहिती अधिकाराखाली पत्रं आलं तर ती माहिती देणं लागत त्याच्यासाठी लपवाछपवी करण्याची गरज नाही. आणि ते करु नये असे आदेश मा.महापौर साहेब आपण त्यांना द्यावेत. आणि ज्योत्सना शिंदेच्या बाबतीत अत्यंत तातडीने आपल्याला निर्णय घ्यावाच लागेल. कारण त्यांच्यामुळं जर का अशा प्रकारचे

,

कुठे प्रसंग येऊन बसतील तर आपण त्यांच्यावरती कठोर कारवाई केलीच पाहिजे. अधिका-यांच्या दौ-यांच्या बाबतीतआम्ही मागच्या वेळेस पण सांगितलं की, अधिका-यांचे दौरे असतील,नगरसेवकांचे दौरे असतील त्यांनी त्या दौ-यामध्ये काय अभ्यास केला हे आम्हांला कळू द्या कोणाच्या दौ-याला मला विरोध करायचा नाही, कोणाच्या दौ-याशी माझं देणं घेणं नाही पण जात असतील तर सांगा जे चांगलं आहे ते घेऊ नसेल चांगल तर,नसेल पण काय  लोक प्रसिध्दीसाठी काहीही करु शकतात. तुम्ही सांगा आम्हांला आपलंच चांगल आहे आणि दौ-यावरती कोणी बोलायचं मागचे १० वर्ष त्या बाकावरती बसुन ज्यांच्या दौ-यावरती आम्ही बोलत होतो त्याच दौ-याविषयी बोलतात  मागच्या पंचवार्षीक मध्ये स्मार्ट सिटी, स्मार्ट सिटी करत स्मार्ट वॉर्ड होते त्याच्या आधी एसआरए होत, कुठं भ्रष्टाचार नव्हता ते सांगा टॉप टु बॉटम जो विषय होता तो भ्रष्टाचारानं शोधला,कागदोपत्री सिध्द केला,सिध्द केल्यानंतर पत्रकारांनी तो छापला आणि त्याच्यावरती आम्ही हायकोर्टामध्ये गेलो स्वत:च्या पैशानी पिटीशन दाखल करुन याठिकाणी स्टे घेतला आहे. आणि नुसतच बोलाची कढी,बोलाचा भात करण्यामध्ये अर्थ नाही. मगाशी आपण सांगितलं की, स्ट्रक्चरल ऑडीट केलं पाहिजे. साहेब, मी तुम्हांला घरकुलचा एक किस्सा सांगते, घरकुल प्रकल्प पहाण्यासाठी आम्ही गेलो होतो वरिष्ठ अधिकारी तांबे साहेब, यांनी सांगितलं की याचं स्ट्रक्चरल ऑडीट केलेलं  नाही. आमचा नेमका गॅलरीत पाय गेला त्याचा कलर वगैरे झालेला होता त्याठिकाणी पाय दिल्या,दिल्या त्याची भिंत कोसळली. आता काय स्ट्रक्चरल ऑडीट केलं होत काय माहित आणि मग त्याच्यानंतर त्याचा वारंवार पाठपुरावा करुन,त्याच्यासाठी पत्रव्यवहार करुन, त्याच्यावरती टिका करुन ते करण्यास भाग पाडलं. हे काम चांगल्या पध्दतीनं करा, तुमचा कॉन्ट्रॅक्टर चांगल्या पध्दतीने काम करीत नाही. जिथे हजारो लोक रहातात त्या लोकांच्या जिवीताशी खेळ खेळण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज तुम्ही झोपडपट्टी पुर्नवसन प्रकल्प सांगताय आम्ही बांधला आहे का? त्या प्रकल्पाची काय अवस्था आहे हे जाउन बघा. आम्ही सांगितलं होत स्टीलचं शिट बसवा, सिंकींग फंड ठेवा,  आज त्याठिकाणी गोरगरीबांच्यासाठी घरे बांधतो आणि त्यांच्याकडे पैसे नसतात म्हणून सिंकींग फंड करण्याचा कायद्यामध्ये तरतुद केली होती. त्यावेळेस सिंकींग फंड ठेवावा वाटला नाही,आता कुठून दुरुस्ती करायची,लिफ्टचा खर्च,  दुरुस्ती कुठून करायची  भाटनगरला जाऊन बघा काय परिस्थिती आहे. तिथं सगळया बिल्डींगच्या लाईट गेल्या आहेत  खाली पाण्याच्या मोटारी बंद झालेल्या आहेत पाणी वर चढत नाही,लोक खालून वर पाणी घेऊन जातात, लोकांची पाय वाकडी झालेली आहेत, याला कोण जबाबदार आहे. ज्यावेळेस आम्ही सांगत होतो नियम पाळा  त्यावेळेस तर लई जोर होता हम करोसो कायदा, आता का? हरकत नाही, चुकलं म्हणुन आम्ही चुकावं या मताशी मी अजिबात नाही. परंतु त्यांनी ज्या चुका केल्या,आता अधिका-यांना कसं वाटतं, कारण तसंच काम करण्याची यांना सवयच लागली आहे नां.सिंकींग फंड ठेवला नाही, दुरुस्तीसाठी पैसे ठेवले नाहीत.

,

आज सगळया झोपडपट्टीधारकांचे हाल आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प करीत आहात त्यावर आपलं काय नियंत्रण आहे. कोण अधिकारी आहेत तिकडे,ज्यांनी कोणी प्रपोजल टाकलेलं आहे त्यावर काय नियंत्रण आहे आपलं,काहीच नियंत्रण नाही. आणि महापालिकेने ज्याचा टीडीआर ताब्यात घेतलेला आहे, ज्याचा टीडीआर घेतलेला आहे त्या जागेवरच्या झोपडपट्टया आपण काढू शकत नाही. आणि आताचा २००८-०९ चा टीडीआर दिलेला आहे तो या बेसवर दिला आहे की, आपण समोरच्या माणसांकडनं शपथपत्र घ्यायचं याठिकाणी एकही झोपडी शिल्लक राहणार नाही त्याचा टीडीआर मला देण्यात यावा. शपथपत्र घेतल्याशिवाय ती जागा मोकळी होत नाही. काय कारण आहे, याठिकाणी झोपडपट्टी हलवू शकत नाही आपण त्यांना टीडीआर दिलेला आहे. मा.महापौर साहेब,अशा प्रकारचं काम आपल्या विभागामध्ये चालू आहे. आपलं त्यावर काय नियंत्रण आहे. आज टीडीआरच्या बदल्यात ताब्यात असलेल्या जागेवर किती ठिकाणी अतिक्रमण झालेलं आहे. काय करतो आपण, काहीच नाही, आणि या सगळयावरती ख-या अर्थानं चांगल काम करण्याची,चांगले अधिकारी नेमण्याची खरी गरज आहे. याच महानगरपालिकेत दोन पुररेषा असलेले नकाशे, याच महानगरपालिकेत डीपी,याच महानगरपालिकेत वाटेल ते घोटाळे अनेक आहेत. आणि आम्ही ते कागदोपत्री सिध्द केलेले आहेत. आणि म्हणुन मा.महापौर साहेब,आम्हांला वाटत असेल आम्ही चुकीचं करत असु, चुकीचं करीत असेल तर टिका निश्चितपणे झाली पाहिजे. टिका करताना नुसतं वायफळ टिका न करता त्याच्यावर योग्यपणे आपल्याला निर्णय सुध्दा घेता आला पाहिजे. मा.महापौर साहेब,झोनिपु विभाग असेल,पाणीपुरवठा विभाग असेल, विदयुत विभाग असेल,जलनिस्सारण विभाग असेल या सगळयांची अशी परिस्थिती आहे की, हा खोदतो रस्ता बुजवतो, दुसरा येतो तो खोदतो रस्ता बुजवतो,तिसरा येतो रस्ता खोदतो आणि कसा तरी बुजवतो. एकच रस्ता किती वेळा खोदायचं ,यांच्यामध्ये अजिबात समन्वय नाही. आणि मागच्या वेळेस तुम्हीच सांगितलं की, हे रिस्टोअर करुन देणार आहेत आपल्याला एक रस्ता किती वेळा खोदायचा परत म्हणायचं आम्ही नाही खोदला,पाणीपुरवठा विभागाने खोदला,त्यांनी म्हणायचं स्मार्ट सिटीने खोदला आहे. त्यांनी म्हणायचं मेट्रोवाल्यांनी खोदला आहे. कुठं तरी कॉऑर्डीनेशन असलं पाहिजे. मा.महापौर साहेब, मा.कमिशनर साहेबांनी सांगितलं आहे की,शाळेचा विषय आहे. नाही तरी हे काम तुमच्या जबाबदारीत करणार आहात आमचं काही म्हणणं नाही. आम्ही तर हे कोणाच्याही लक्षात आणुन देणार नाही. परंतु हे सगळं करीत असताना याठिकाणी रेडझोनचे जितके नगरसेवक आहेत सगळयांनी जागरुक रहा रेडझोनची मोजणी चालू आहे हायकोर्टाने सांगितले आहे. गेली ३ आठवडे झाले हायकोर्टाची मोजणी चालू आहे. तिथे जा,थांबा,आणि त्या देहुरोड ऍम्युनिशनच्या संरक्षण भिंतीपासून आपल्यापर्यंत २ हजार यार्ड कुठे बसतो ते बघा त्यासाठी लक्ष घाला आणि तो कमी करायचा का नाही करायचा हा केंद्र शासनाचा प्रश्न आहे. कारण त्याठिकाणी कुठलाही केंद्रीय संरक्षणमंत्री निर्णय घेण्यास घाबरतात

,

कारण एखादया वेळेस चुकीचं काही झालं तर मी संपेन किंवा देशात काही घडलं तर त्याची जबाबदारी माझ्यावर येईल पण आता तुम्ही सगळेजण आहात, तुम्ही भूमीपुत्र आहात,तिथे जमीनी आहेत त्याच्यावर लक्ष द्या. इलेक्शन आलं तर परत पुन्हा इथं उपोषण,तिथं उपोषण पण आता तिथं कोण जाणार नाही. आता तिथं फक्त कोर्टाची लोक आहेत महापालिकेचे आणि प्राधिकरणाचे लोक घेऊन मिल्ट्रीचे जे अधिकारी आहेत त्यांच्यकडे जाऊन बघा. मा.महापौर साहेब,आपण हा .विषय मंजुर करावा आणि पुढील विषयाला सुरुवात करावी.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा. भिमाबाई फुगे** –मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ४९८ विषय क्रमांक-३

दिनांक २०/१/२०२० खाते- मा.आयुक्त

**संदर्भ–** १) मा.राजेंद्र लांडगे व मा.संतोष लोंढे यांचा प्रस्ताव

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.६३६५ दि. ८/१/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ९ मध्ये नेहरूनगर मुख्य रस्त्यावर सुमारे २४ गुंठे एवढ्या क्षेत्रफळाचा आरक्षण क्र.६६ हा भुखंड मनपा ताब्यात आलेला आहे. सदर भुखंड हा बस डेपो साठी आरक्षित आहे. या भुखंडावर बस डेपो उभारलेस भविष्यात होणा-या वल्लभनगर, पिंपरी या मेट्रो स्टेशनसाठी मिनी बस या डेपोमधून सोडता येतील तसेच सदर भुखंडावर बस डेपो बांधुन मिळणेबाबतची मागणी पी.एम.पी.एम.एल यांनी मनपाकडे केलेली आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकातील पा.क्र. व अ.क्र. | लेखाशिर्ष | प्रशासकीय मान्यता | सन २०१९-२० करीता तरतुद | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | पिंपरी नेहरूनगर मुख्य रस्त्यावरील आरक्षण क्र.६६ मध्ये | नविन काम | विशेष योजना | १० कोटी | ० | ५ लाख | |

,

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पी.एम.पी.एम.एल. साठी बस डेपो बांधणे व अनुषंगिक कामे करणे | | | | | | | |
| २) | भुसंपादन निधी | ५/११ | भुसंपादन निधी | | १४० कोटी | | ५ लाख |
| | एकुण | | | | | ५ लाख | ५ लाख |

वरील कामाचा महापालिकेच्या सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात नव्याने समाविष्ठ करून तरतूद वर्गीकरणास व रक्कम रू. १० कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा. जयश्री गावडे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ४९९ विषय क्रमांक-४

दिनांक २०/१/२०२० खाते- मा.आयुक्त

**संदर्भ** – १) मा.मनिषा पवार, मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.२४, दिनांक २०/१२/२०१९

मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र.संकीर्ण–2016/प्र.क्र.43/16 नवि-28 दि.14 नोव्हेंबर 2017 नुसार प्रत्येक महानगरपालिकेने दिव्यांग बांधवांचे विषय हाताळण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिकेतील एका उप-आयुक्तांवर सोपवावी व याची सविस्तर माहिती शासनास सादर करावी. तसेच शासन निदेशाचे तत्परतेने व काटेकोरपणे पालन होईल, या दृष्टीने संबंधितांनी तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करावी असे सर्व महानगरपालिका आयुक्त

,

यांना लेखी कळविले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासन विभागाकडील सहाय्यक आयुक्त यांचे पत्र क्र./प्रशा/07/कावि/449/2019 दि.25.06.2019 चे पत्रानुसार दि.30 जुलै 2016 अन्वये मा.शासनास पाठविण्यात आलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2016 व आकृतीबंध यामध्ये एकूण 08 उपायुक्त अभिनामाची पदे निर्माण करणेत आलेली आहेत. त्यापैकी समाज विकास विभागासाठी 01 उपायुक्त नवीन पदाचा समावेश आहे. सदरचे सेवा प्रवेश नियम व आकृतीबंध हे अंतिम मान्यतेकामी शासन स्तरावर प्रलंबित आहेत. दिव्यांग व्यक्तींसाठी कार्य करणा-या संघटनांनी सुद्धा या शासन निर्णयाची त्वरीत अंमलबजावणी करुन दिव्यांग व्यक्तींच्या योजनांसाठी स्वतंत्र कक्ष आणि स्वतंत्र अधिकारी यांची नियुक्ती करावी अशी मागणी केली आहे. दिव्यांग बांधवांचे विषय हाताळण्याच्या दृष्टीने श्री.संभाजी भगवान ऐवले हे समाज विकास अधिकारी गट-ब या पदावर दि.22.08.2014 पासून नागरवस्ती विकास योजना विभागात कार्यरत आहेत. याच विभागात त्यांची 21 वर्षे सेवा झालेली आहे. तसेच महापालिकेत एकूण 33 वर्षे सेवा पूर्ण झाली आहे. त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता व सेवानिवृत्ती दिनांक 31.05.2021 या सर्व बाबी विचारात घेता, तसेच आदेश क्र.लेखा/1अ/कावि/796/2019 दि.29.06.2019 चे आदेशान्वये समाज विकास अधिकारी या पदाचे वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करणेत आलेली आहे. या पदास सुधारीत वेतनश्रेणी र.रु.9300 – 34800 ग्रेड पे 5400 लागू करणेत आलेली आहे. समाज विकास अधिकारी हे पद प्रशासन अधिकारी समकक्ष आहे. श्री.ऐवले हे एकमेव सहाय्यक आयुक्त या पदाकरिता निर्धारीत करण्यात आलेली अर्हता धारण करीत आहेत. त्यामुळे त्यांचेकडे दिव्यांग बांधवांचे विषय हाताळण्याची जबाबदारी सोपविण्यात यावी. वेतनश्रेणी रक्कम रुपये 15600 – 39100 ग्रेडपे 6600 सहाय्यक आयुक्त या पदावर श्री.ऐवले यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 45(4) मधील तरतुदीनुसार मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन नगर विकास यांचेकडील दि.14 नोव्हेंबर 2017 चे परिपत्रकानुसार पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

,

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५०० विषय क्रमांक-५

दिनांक २०/१/२०२० खाते- मा.आयुक्त

**संदर्भ**– १) मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/०६/२०२० दिनांक ०६/०१/२०२०

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान" च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु.४,९३,१४,९६१/- व ९,१०,५४,९७४/- असे एकुण र.रु.१४,०३,६९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे. प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु.४,०००/-, राज्य शासनाचे र.रु.८,०००/- व मनपा हिस्सा र.रु.४,०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/१२/२०१९ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे-

प्रपत्र- 'अ'

| **महानगरपालिकेचे नाव** | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|
| जिल्हा | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | १७८७९ | |
| केंद्र शासनाचे "स्वच्छ भारत अभियान"च्या | १७८७९ | |

,

| | | | |
|---|---|---|---|
| संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १५३६८ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण - १५२८५ | मनपामार्फत बांधकाम पुर्ण – १०५२८ सी.एस.आर (एनजीओ)मार्फत बांधकाम - ४७५७ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ५८२ सीटस | महिला– २६२ सिटस कामकाज पूर्ण पुरुष – ३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता | १०८७५लाभार्थी | GOI + GOM = ६५२.५० लाख | GOI = २०००/- व GOM = ४०००/-हिस्सा |
| | | ULB = २१७.५० लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८७०.०० लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | १०२३२लाभार्थी | GOI + GOM = ६१३.९२लाख | GOI = २०००/- व GOM = ४०००/-हिस्सा |
| | | ULB = २०४.६४ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८१८.५६ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

,

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा. उत्तम कैंदळे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५०१ विषय क्रमांक-६

दिनांक २०/१/२०२० खाते- मा.नगरसचिव

**समित्यांचे अहवाल**

**मा.विधी समिती**

अ) दिनांक ०४/१०/२०१९, १८/१०/२०१९, ०१/११/२०१९ १५/११/२०१९ व ०६/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक २०/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.संदिप कस्पटे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा. उत्तम कैंदळे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५०२ विषय क्रमांक-७

दिनांक २०/१/२०२० खाते- मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दिनांक २८/११/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १२/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. संदिप कस्पटे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल-८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

,

**मा. उत्तम कैंदळे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५०३ विषय क्रमांक-८

दिनांक २०/१/२०२० खाते- मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दिनांक २७/११/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक ११/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. संदिप कस्पटे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल-८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा. उत्तम कैंदळे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५०४ विषय क्रमांक-९

दिनांक २०/१/२०२० खाते- मा.नगरसचिव

**मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती**

अ) दिनांक २७/०९/२०१९, ११/१०/२०१९, ०८/११/२०१९, २२/११/२०१९ (दु.२.४५वा) व ३०/११/२०१९ (दु.३.४५ वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक २२/११/२०१९ (दु.३.०० वा.) व ३०/११/२०१९ (दु.४.०० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. संदिप कस्पटे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल-८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा. उत्तम कैंदळे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

,

ठराव क्रमांक- ५०५ विषय क्रमांक-१०

दिनांक २०/१/२०२० खाते- मा.नगरसचिव

**मा.शिक्षण समिती सभा**

अ) दिनांक ०३/१०/२०१९, १७/१०/२०१९ व ०७/११/२०१९ (दु.१,४५ वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक ०७/११/२०१९ (दु.२.०० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दिनांक २१/११/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ड) दिनांक ०५/१२/२०१९, १९/१२/२०१९ व २३/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

इ) दिनांक १९/१२/२०१९ २३/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. संदिप कस्पटे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल-८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक-११

दिनांक २०/१/२०२० खाते- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापलिका आयुक्त यांचे
जा.क्र.स्था/EWSप्र/७०/२०२० दि.१८/१/२०२०
२) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.
स्था/EWSप्र/७१/२०२० दि.१८/१/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत केंद्रीय गृहनिर्माण व शहरी गरीबी निर्मुलन मंत्रालयाने निर्गमित केलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शन सुचनांचा अवलंब करुन ठिकठिकाणी आरक्षित जागांवर सर्वांसाठी घरे संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री

,

आवास योजना राबविणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत राबविण्यात येणा-या योजनेकरिता मा.महापालिका सभा ठराव क्र.३९, दि.२०/०६/२०१७ मंजूर आहे. सदर ठरावानुसार सद्यस्थिती च-होली, रावेत व बो-हाडेवाडी येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे बांधणे प्रकल्प चालू आहेत.

सदर योजनेअंतर्गत विकास आराखड्यातील EWS, HDH आरक्षित जागा ताब्यात घेऊन त्याठिकाणी २.५ चटई निर्देशांक वापरुन प्रकल्पास शासन मान्यता घेऊन बांधकाम परवानगी नियमानुसार (DCR) पर्यावरण विभागाच्या परवानगी प्राप्तीनंतर प्रकल्प राबविणेत येत आहे. त्यानुसार सद्यस्थितीत खालील प्रकल्पांचे सुरवात करणेत आली आहे. सदर प्रकल्पामध्ये १४ ते १५ मजली इमारतीमध्ये ३० चौ.मी. चटई क्षेत्राच्या सदनिका बांधणेचे नियोजन आहे.

सदर योजना ही खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे (Affordable Housing in Partnership) या घटकाचा अवलंब करुन राबविणेत येत आहे. या घटकांतर्गत केंद्र शासनाकडून १.५ लक्ष प्रति सदनिका इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या घटकाखाली ३० चौ.मी. चटई क्षेत्रापर्यंतची घरकुले अनुज्ञेय आहेत. या घटकाखाली राज्य शासनामार्फत प्रति घरकुल र.रु.१ लक्ष इतके अनुदान अनुज्ञेय राहील. त्यानुसार खालील प्रकल्पांना राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती, केंद्रीय मान्यता व सनियंत्रण समिती यांचे मान्यतेने राबविणेस मान्यता घेण्यात आली आहे.

पंतप्रधान आवास योजनेचे पिंपरी चिंचवड शहरातील इच्छुक लाभार्थींना लाभ करुन देणेकामी मा.महापौर यांचे समवेत सर्व पक्षनेते यांच्या झालेल्या बैठकीत पुढीलप्रमाणे प्रक्रिया पार पाडणेबाबत निर्णय घेणेत आले आहेत.

१) दिलेल्या कालावधीमध्ये इच्छुक लाभार्थीने मनपाने दिलेल्या लिंकद्वारे आवश्यक फॉर्म ऑनलाईन भरुन, सदर फॉर्मची प्रिंट काढून तो नागरी सुविधा केंद्राकडे प्रस्तृत करावयाचा आहे.

२) नव्याने फॉर्म भरणारे - ज्या लाभार्थ्यांनी यापुर्वीच्या सर्वेक्षणात भाग घेतलेला नव्हता त्यांनी स्वतःचा फॉर्म व कागदपत्रे (आधार कार्ड, रेशन कार्ड, पॅन कार्ड, वोटर कार्ड, जात प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, बँक पास बुक, वीजबिल, प्रति प्रकल्पासाठी रु.५,०००/- (डी.डी.) डिमांड ड्राफ्ट, २ पासपोर्ट आकाराचे फोटो) तपासणीसाठी पात्रता पडताळणी नागरी सुविधा केंद्राकडून करुन घेणे आवश्यक राहील व त्याच ठिकाणी सदर फॉर्म व कागदपत्रे व र.रु.५०००/- चा D.D. जमा केलेनंतर पोहोच पावती देणेत येईल.

,

३) यापुर्वी फॉर्म भरलेले - ज्या लाभार्थीनी यापुर्वीच्या सर्वेक्षणामध्ये भाग घेऊन अर्ज सादर केला होता त्यांनी फक्त ऑनलाईन फॉर्म भरुन त्याची प्रती सह र.रु.५०००/- चा D.D. जमा केलेनंतर पोहोच पावती देणेत येईल. तसेच मधील कालावधीत नियमानुसार उत्पन्नापेक्षा वाढ अथवा स्वतःचे मालकीचे घर घेतल्यामुळे पुर्वी फॉर्म भरलेल्यांपैकी सदर इच्छुक लाभार्थी सोडतीत भाग घेणेस अपात्र ठरतील.

४) क्र.२ नुसार सादर होणारे अर्ज नागरी सुविधा केंद्रामार्फत पडताळणी करावयाची झालेस सदर केंद्रांना आवश्यक प्रशिक्षण, माहिती व तंत्रज्ञान विभाग व CLTC मार्फत देणेत येईल व प्रत्यक्ष फॉर्मचे तपासणी व पडताळणी फी म्हणून नागरी सुविधा केंद्रास र.रु.२५/- प्रति फॉर्म पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत अदा करणेत येईल.

५) सदर प्रक्रियेचा कालावधी ३० दिवस राहील.

६) सर्व पात्र लाभार्थ्यांची यादी ऑनलाईन वेबसाईटवर प्रसिध्द करुन लॉटरी पध्दतीने सोडत काढून प्रत्येक प्रकल्पाकरीताचे लाभार्थी निश्चित करणेत येतील.

७) इच्छुक लाभार्थीनी भरावयाच्या फॉर्ममध्ये तीन प्रकल्पांचा विकल्प भरणेस मुभा असेल.

८) र.रु.५०००/- ही सदनिकेच्या किंमतीतून वजावट करणेत येईल व सदनिका न मिळालेल्या लाभार्थीना सदर रक्कम परत करणेत येईल.

९) प्रतिक्षा यादी ठेवणे अथवा रद्द करणेचा कायदेशीर अधिकार मनपाने राखून ठेवलेले आहेत.

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील खालील प्रकल्पांची सद्यस्थितीत वाटप करण्याचे प्रस्तावित करणेत येत आहे. सदर प्रकल्पांना पर्यावरण दाखला व महारेरा अंतर्गत नोंदणी देखील करण्यात आलेली आहे. या प्रत्येक प्रकल्पांचे निविदेनुसार होणाऱ्या खर्चावर आधारीत प्रति सदनिका खर्च निश्चित केलेला आहे. प्रत्येक प्रकल्पासाठी लाभार्थी हिस्सा खालीलप्रमाणे प्रपत्र अ नुसार येत आहे.

<u>**प्रपत्र अ**</u>

| **अ.क्र.** | **प्रकल्पाचे नाव** | **एकुण सदनिका** | **प्रति सदनिकेची बांधकाम किंमत (र.रु.लाखात)** | **प्रति सदनिका केंद्र शासन अनुदान (र.रु.लाखात)** | **प्रति सदनिका राज्य शासन अनुदान (र.रु.लाखात)** | **प्रति सदनिका लाभार्थी हिस्सा (र.रू लाखात)** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | चऱ्होली | १४४२ | ९.१९ | १.५० | १.०० | ६.६९ |

,

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | रावेत | ९३४ | ९.४५ | १.५० | १.०० | ६.९५ |
| ३ | बोऱ्हाडेवाडी | १२८८ | ८.७१ | १.५० | १.०० | ६.२१ |
| **एकुण** | | ३६६४ | | | | |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे प्रति सदनिकेसाठी केंद्रशासन र.रु.१.५० लाख, राज्य शासन र.रु.१ लाख अनुदान देणार आहे. तसेच उर्वरित रक्कम हा लाभार्थी हिस्सा राहणार असून तो ३ टप्प्यांमध्ये (४०%+४०%+२०%) लाभार्थ्यांकडून घेण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचे आर्थिकदृष्ट्या अतिकार्यक्षम व अतिव्यवहार्य (Most Economical Feasiblity) वसुलीच्या पर्यायापैकी लाभार्थीकडून घरकुलच्या किंमतीपोटी वसूल करावयाचे हिश्श्याची रक्कम वरीलप्रमाणे असून सदर रक्कम बांधकामाच्या ठराविक टप्प्यानंतर घेणेत येणार आहे. हिश्श्याचे टप्पे रेरा नियमानुसार ठेवण्यात आलेले आहे. तसेच सदर प्रकल्पामधील मुलभूत सुविधा विषयक (Infra Work) कामे, भाववाढ फरक अदायगी ही पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत करण्यात येणार आहे. म्हणजेच महानगरपालिकेचा आर्थिक सहभाग म्हणून सदर प्रकल्प मनपाचे जागांवर करणे व प्रकल्पातील सुविधा पुरविणेचा खर्च, विकास शुल्क माफी व भाववाढ खर्च, अस्थापना खर्च या स्वरुपात असणार आहे.

सदर प्रकल्पांचे एकुण ३६६४ सदनिकांसाठी लाभार्थी व लाभार्थी हिस्सा व सोडत प्रक्रिया निश्चित करणे आवश्यक आहे. तरी च-होली, रावेत व बो-हाडेवाडी येथील प्रकल्पांसाठी लाभार्थी व लाभार्थी हिस्सा व सोडत प्रक्रिया निश्चित करणेचा वरीलप्रमाणे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**मा.नामदेव ढाके-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आपण याठिकाणी हा जो १ के खाली विषय आणलेला आहे.आपण याठिकाणी ज्या ३ ठिकाणी महापालिकेच्या वतीने ज्या स्कीम करतो त्याच्या पोटीचे लाभार्थी पूर्वी ज्यांनी अर्ज केलेला आहे अशा लाभार्थीना आणि नव्याने काही लोकांना अर्ज करायचा अशा लाभार्थ्यांसाठी आपण हा विषय आणलेला आहे. याच्यामध्ये मला पहिला जो मुद्या दिसतो आहे पूर्वी फॉर्म भरताना ५ हजार घेतलेले नव्हते आणि आता आपण फॉर्म भरताना प्रत्येकांकडुन ५ हजार रु.चा डीडी मागितला आहे. आणि पुर्वी ज्यांनी कोणी अर्ज भरलेले आहेत त्यांचा देखील आपण नव्याने डीडी घेणार आहात हे माझ्या वाचनात आलं आहे. तर याच्यामध्ये माझी आपल्याला विनंती आहे की, म्हणजे खरंच हे ५ हजार रु.घेण्याची गरज आहे का?

,

मुळात हे लोक अर्ज भरल्यानंतर ते पात्र होतात की नाही हा एक मुख्य प्रश्न आहे. आधीचे जे अर्ज आपल्याकडे सबमीट केलेले आहेत जो डाटा आहे त्याच्या अनुषंगाने रिफंडच्या खोलात जायचा जेंव्हा प्रयत्न केला तर सगळयाच लोकांना ती घरे कमी किंमतीत अपेक्षीत आहेत कारण त्यांचे बँकेचे जे आर्थीक रेकॉर्ड आहे ते कधी तरी उघडतात त्यामुळे माझी पहिली विनंती आहे की, आपण ५ हजार रु.हे आकारु नये. कमीत कमी असावेत दुसरा मुद्या आहे की, त्यांना तुम्ही जे फ्लॅट देणार आहात त्या किंमतीतुन हे वजा करणार आहात तरी पण माझी विनंती आहे की, हे ५ हजार रु.जास्त होत आहेत. दुसरी गोष्ट याच्यामध्ये एक वाक्य आलेलं आहे की, आपण प्रायव्हेट पार्टनरशिप मध्ये हा प्रोजेक्ट करीत आहोत कदाचित हे वाक्य चुकून आले असेल असे वाटते. हे तीनही विषय आहेत ते महापालिकेच्या स्कीममधुन करणार आहात. प्रायव्हेट पार्टनरशिप हे वाक्य टाकण्यामागे नेमकं कारण काय आणि प्रायव्हेट बिल्डर आणि महापालिकेच्या एकत्रितपणे प्रोजेक्ट करणार आहोत.पुर्वी आपले डिस्कशन झाले त्याप्रमाणे आपण डेव्हलपमेंट चार्जेस १०० माफ व्हावे अशा प्रकारची भूमीका प्रशासनाला तोंडी सांगत होतो परंतु नंतर असं लक्षात आलं की त्याच्यामध्ये माफी मिळणार नाही. आणि मग याच्यामुळे माहितीप्रमाणे प्रायव्हेट पार्टनरशिपमध्ये महापालिकेचा एकच प्रोजेक्ट चालू आहे. मुळात ही केंद्रशासनाची घरकुलाची महत्वाकांक्षी योजना आहे आणि याच्यामध्ये लाखो घरे बांधण्याची भूमिका शासनाची आहे. परंतु प्रत्यक्षामध्ये असं न रहाता महापालिकेच्या वतीने ३३६४ एवढीच घरे आपण बांधु शकतो. अजुन काही अशी आरक्षणे आहेत त्याच्यामध्ये आपण डेव्हलपमेंट करणार आहोत. जी काही प्रोजेक्ट आपण प्रायव्हेट पार्टनरशिपमध्ये करणार आहोत याच्यामध्ये काही सुट द्यावी लागणार आहे तरच आपल्या शहरातील जवळपास ४० हजार अर्ज आपल्याकडे आलेले आहेत नवीन अर्ज आपण ३० दिवसाची मुदत देवुन स्विकारणार आहोत जवळपास यामध्ये १ लाख अर्ज येण्याची शक्यता नाकारता येत नाही. एवढी डिमांड या घरासाठी असणार आहे. आणि लाभार्थी हे अर्ज देताना कदाचित त्याची इलीजीबिलीटी तपासावी लागणार आहे. आणि या दृष्टीकोनातून आपल्याला तयारी ठेवावी लागणार आहे. विशेषता आपल्याकडे पाण्याचा प्रॉब्लेम खुप आहे. भामा आसखेड आणि आंद्र धरणाचं पाणी आपण आणु शकलो नाही. चिखली याठिकाणी १०० एमएलडी पाणी आणणार आहात पण त्यालाही अजुन दोन वर्षाचा कालावधी लागणार आहे. आणि म्हणुन आपल्याला या कामाचा स्पीडअप ठेवावा लागणार आहे. याचा ताण पूर्ण शहराच्या पाणीपुरवठयावरती येणार आहे. या पाण्याच्या विषयावर अनेक सभा झालेल्या आहेत. त्यामुळे हे होत असताना मागे सुध्दा जेंव्हा

,

आपण वाघोली योजनेचे पाणी पुणे शहराला देतो त्यासंदर्भात खुलासा केला तरी ते पाणी आपल्याला जेंव्हा भामा आसखेडचं पाणी चालू होईल तेंव्हा ते पाणी आपल्याला मिळणार आहे. त्या संदर्भात नेमकं काय झालं या ही गोष्टीचा आपल्याला यामध्ये विचार करावा लागणार आहे. यापध्दतीने आपल्याला घरे बांधायची असतील पुढच्या दृष्टीने इन्फ्रास्ट्रक्चर तेवढं चांगल कराव लागणार आहे यामध्ये पाणी,ड्रेनेज,विदयुत किंवा स्थापत्य विभागाशी संबंधित जे काही कामे असतील ती कामे आपल्या महापालिकेच्या खर्चातून करावी लागणार आहेत. कारण तुम्ही याठिकाणी जी रक्कम काढलेली आहे यामध्ये बाकीचा खर्च महापालिका काढणार आहे. तीन टप्प्यामध्ये जो खर्च घेणार आहे तो फक्त लाईटचा खर्च असणार आहे. बाकीचा खर्च हा महापालिकेच्या वतीने केला जाणार आहे. हे करीत असताना मगाशी सिमाताईंच्या भाषणामध्ये उल्लेख झाला आहे जेंव्हा आपण ही घरे बांधणार आहोत माझ्या माहितीप्रमाणे ५ वर्षाचं मेंन्टनंन्स बांधकाम व्यवसायिकावर असणार आहे त्याच्यामुळे फ्लॅटधारकांना कुठलाही खर्च करावा लागणार नाही जवळपास आपण १४,१५ इमारती बांधतोआहे. त्याच्यामध्ये चांगल्या ब्रँडची टाकली पाहिजे त्याठिकाणी लिफ्टचं मेंन्टनंन्स खूप जास्त असणार आहे. या गोष्टीचा सुध्दा त्या टेंडरमध्ये उल्लेख झालेला आहे का हे तपासणं गरजेचं आहे कारण पुढच्या काळामध्ये असं व्हायला नको की,काम झालं पण त्याचं मेंन्टनंन्स करण्यामध्ये आपल्याला अडचणी येऊ शकतात कारण उंच इमारती आहेत तसेच त्याठिकाणी सिव्हेज  ट्रिटमेंट प्लॅन्ट करतो त्याठिकाणी तो मेजर खर्च असतो. तरी त्या खर्चाचा विचार केला नसेल तर तो करावा. आणि तो खर्च नेमका किती आहे याचा खुलासा प्रशासनाकडुन झाला पाहिजे. आणि भविष्यात या ईडब्युलएस किंवा पीएम आवास योजना मधुन जी घरे तयार आहेत त्या लोकांवरती उद्याच्या काळामध्ये तशा प्रकारचं मुल्य पडू नये अशी अपेक्षा याठिकाणी व्यक्त करतो आणि आपण ५ हजार रु.चा जो डीडी ची मागणी केली आहे त्याच्यामध्ये सुट देण्यात यावी अशी विनंती करतो.

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह मा.आयुक्त साहेब,मी आपलं अभिनंदन करते की, आपण याठिकाणी चांगला विषय आणलेला आहे. पण सन्मा.सदस्य अजित गव्हाणे म्हणले की, ५ हजार रु.डीडीच्या ऐवजी ५०० रु.करावं असं मी याठिकाणी सूचना करते. तसंच च-होली,रावेत,बो-हाडेवाडी याठिकाणी जेवढी बांधकामाची पोझीशन आहे तशीच पिंपरीमध्ये पण आहे. मग पिंपरी हा विषय याठिकाणी ॲड का केला गेला नाही. आयुक्त साहेब, आपण म्हणले आहे की, त्या,त्या ऐरितील

,

लोकांनी त्या,त्या ऐरियाचं स्पेसिफिक एरिया टाकुन फॉर्म भरायचा आहे. तर मग च-होली,रावेत,बो-हाडेवाडी यामध्ये माझ्या एरियामध्ये पिंपरीत सुध्दा चालू आहे त्या लोकांनी काय करायचं तो विषय याठिकाणी ऍड का करण्यात आला नाही. पिंपरीचं ही ऍड केलं पाहिजे,ब-यापैकी त्याठिकाणचंही काम उचललं गेलं पाहिजे. तो ही याठिकाणी ऍड करावा अशी मी सूचवु इच्छिते. सर्वात जास्त काम पिंपरी याठिकाणी झालेलं आहे. पिंपरी हा विषय न घेण्याचं कारण काय? खुलासा द्यावा.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह मा.आयुक्त साहेब,आपण याठिकाणी लाभार्थी ठरवतोय याच्यामध्ये लाभार्थी पात्रतेचे निकष ठरवतोय. म्हणजे काल जर कोणी गावावरुन आला तर तो याठिकाणी फॉर्म भरु शकतो. असंच आहे नां खुलासा देताय द्या, याच्यामध्ये पात्रतेचा निकष काय आहेत हे सांगा. आयुक्त साहेब, थोडया वेळापुर्वी माझ्या वॉर्डातील कैलास ऍटोवाला म्हणुन आहे त्यांनी मला फोन केला विषयपत्रिकेवर आज विषय आहे आमच्या इथं ५,५ हजार घेऊन फॉर्म घ्यायचं काम चालू केलं आहे. महापालिकेला याच्यामध्ये दुरुस्ती घ्यावी लागेल. वृत्तपत्राच्या लोकांना तुम्हांला सांगावं लागेल खास करुन जिथं स्लम आहे त्याठिकाणी दुकान उघडून बसतात, अनेक लोकांना फसवतात ५,५ हजार रु.भरुन फॉर्म देतात तसं होऊ नये. आणि आज संबंध शहरातून कोणीही येऊ शकतो. हे एका एरियातील नाही. मग तो च-होली, मोशी, डुडुळगांव, रावेत, किवळे, मामुर्डी, पिंपरी असेल, पिंपरीगांव, पिंपरी कॅम्प असेल कोणी पण कुठंही फॉर्म भरु शकतो. शहरी गरीब योजना आहे याच्यामध्ये बंधन काहीच नाही बरोबर आहे. आपण सगळया एरियाचे रेट काढलेले आहेत च-होलीचा रेट आहे ६ लाख ६९ हजार रु. याच्यामध्ये २.५० हजार रु.सबसिडी आहे. रावेत साठी रु.६ लाख ९५ हजार आणि बो-हाडेवाडी येथील रेट आहे ६ लाख २१ हजार रु. पण यासाठी सिंकींग फंड ठेवणं तेवढंच गरजेचं आहे याच्यामध्ये कुठल्याही प्रकारची काटछाट करता कामा नये. कारण ते जर केलं तर या प्रोजेक्टची अवस्था तशीच होणार आहे. विषय चांगला आहे पण याची तुम्ही फी कमी करावी. ५ हजार रु. फॉर्मची फी ठेवली आहे. घरकुलसाठी फॉर्मची फी किती होती. ५०० रु.होती मग याठिकाणी ५ हजार रु. का केली आहे. कमी करा फी, कारण गरीबांना फॉर्म भरताना असं व्हायला नको की, तुमच्या फॉर्मची मुदत संपायची आणि तुम्ही तिथे एखादं जाहीर करायचं. आणि दुसरं एक आपण काम दिलं होतं शहरातील संपुर्ण झोपडपट्टी भागाचा सर्व्हे करायचा त्याला काम देवुन ३ वर्ष झाली आहेत. जितकं तुम्हांला ओपनली रहाता येईल तितकं रहा असं आमचं मत

,

आहे.आमचा तुम्हांला पाठींबा आहे. आज मला अर्ज करावा असं वाटल की निश्चितपणे त्या गरीबांना घरे मिळाली पाहिजे. परंतु त्याच्यासाठी शहरातील सर्व झोपडपट्टयांचा सर्व्हे करायचा त्या सर्व्हेचं काय त्याच्यासाठी लाभार्थी आलेले असतील नां तिथं आपण त्यांना घर देणार होतो. त्या प्रकल्पाला आता ९ वर्ष होत आलेली आहेत. त्यातले काही लाभार्थी आहेत. त्यांना प्रायोरीटीने देता येते का ते बघा त्यांना जर देता आलं तर त्यांच जे आहे महापालिकेमध्ये होते आणि ते महापालिकेकडे आस लावुन बसले होते. तर त्यांना यामध्ये प्रायोरिटीने देता येते का ते बघा. आम्ही वारंवार सूचना करतो की, सगळया भागांमध्ये दिव्यांगासाठी घरकुल मध्ये एक चुक झालेली होती की,आपण दुसरा मजला,चौथा मजला,पाचवा मजला आणि सातव्या मजल्याला अशाच ठिकाणी आपण लिफ्ट दिल्या होत्या. एक,एक मजला सोडून आणि दिव्यांगांना तुम्ही दिलं काही लोकांना पहिल्या मजल्यावर, काही लोकांना तिस-या मजल्यावर ज्या ठिकाणी लिफ्ट नाही त्याठिकाणी दिव्यांगाना देवुन काय उपयोग आहे. तर त्यांची पण त्याठिकाणी काळजी घेतली पाहिजे. पत्रकार बंधु साठी राखीव कोटा ठेवणेत यावा. ५०,३०,२० घरे काही तरी ठेवा. ब-यापैकी लोकांकडे घरे आहेत ज्यांच्याकडे घरे नाहीत ते घेतील. वन बेडरुम,हॉल,किचन आहे. आणि ज्याप्रकारचे रेट गगनाला भिडलेले आहेत नाही पॉसीबल त्यांच्यासाठी बघा, असे काही आहेत विधवा महिला असतील, परित्याकत्या असतील,शेजारच्या पत्नी असतील यांच्यासाठी आपल्याला आरक्षण ठेवणं गरजेच आहे.आणि त्या आरक्षणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे गरजेचं आहे. ज्यावेळेस आपण फॉर्म भरला होता त्यावेळेस आपण सांगितल होतं की, त्या व्यक्तीचं या शहरात कुठेही घर नसावं,आता नसावं पण घरकुल मध्ये असे खूप लोक आहेत. सगळयांची पहिली घरे होती झोपडपट्टी पुनर्वसनामध्ये ज्यांची पहिली घरे होती त्यांना पण घरे देण्यात आलेली नाहीत. याची काटेकोरपणे अंमलबजावणी झाली पाहिजे. याच्यामध्ये आपण निश्चितपणे जातीने लक्ष द्यावं जितक्या लवकर या प्रकल्पामध्ये लोक जातील तितक्या लवकर जाऊ द्यावेत परंतु पात्रतेच्या निकषावर आपल्याला वर्कआऊट करावे लागेल. आणि दुसरं म्हणजे आपल्याला कमी फी ठेवावी लागेल कारण कमी फी ठेवल्यामुळे जास्तीत जास्त लोक येतील आणि पुढं सुध्दा प्रकल्प येणार आहेत नां तर त्यामध्ये सुध्दा सांभाळून घेता येईल. त्याचबरोबर पिंपरी,मोरवाडी ,सेक्टर १२ ला प्राधिकरणाचं बांधकाम चालू आहे त्यांच्याकडे कुठल्या पात्रतेच्या याद्या आहेत त्याही बघितल्या पाहिजेत. महापालिकेने त्यांना अनेक गोष्टीसाठी माफी दिलेली आहे. त्याठिकाणी १००,२०० घरे द्या काही ना काही तरी ॲड होतील. आणि हळुहळु लोकांच्या

,

घरांचा प्रश्न सुटणार आहे. आणि म्हणुन मा.महापौर साहेब, विषय चांगला आहे मंजुर करण्यास हरकत नाही. अशी मी सूचना करते. आणि सदस्यांच्या काही सूचना असतील तर त्या त्याच्यामध्ये अंतर्भाव करता येत असतील तर त्या मोठया दिलाने करुन घ्यावा आणि या विषयाला मंजुरी द्यावी.

**मा.निता पाडाळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आयुक्त साहेब,आपण हा विषय खुप छान आणलेला आहे त्याबद्दल अभिनंदन करते. परंतु मला याठिकाणी एकच बोलायचं आहे आयुक्त साहेब,आपण ज्या लोकांना घरे नाहीत त्यांना घरे देणार आहात. परंतु घरकुल मध्ये काही लोकांना पण अशी घरे दिलेली आहेत की, समजा माझ्या सासु,सास-यांच घर आहे आणि त्या घरांसाठी मी अर्ज केला आहे त्या घरासाठी मी पात्र ठरते की नाही कारण आई-वडीलांचे घर आहे तिथे मुलांला घर मिळालं आहे. हे असं कुठं तरी होते की,घर असुनही घर मिळालेलं आहे. मग काय होतं वार्डमधील लोक आम्हांला म्हणतात ताई आम्हांला खरंच घर नसुनही आम्हांला घर मिळालं नाही आणि ज्यांच एक गुंठयात  घर आहे त्यांना घर मिळालं आहे याची जी चौकशी आहे ती आपण काटेकोरपणे करावी. ही माझी विनंती आहे. आता सिमाताईंनी सांगितलं आहे की, त्यांना झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पामध्ये घर मिळालं आणि दुसरीकडेही घर मिळालं आहे. हे खरं आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पामध्ये घर  मिळालं आहे, स्वत:च घर आहे आणि घरकुल मध्येही घर  मिळालं आहे. असं होता कामा नये. कारण खरंच जे गरजु व्यक्ती आहेत त्यांनाच घरे मिळावीत ही आपल्याला विनंती करते. दुसरं म्हणजे पुर्वी घरकुल वाटप झालेले आहेत त्यामध्ये जे वेटींग लिस्टमध्ये जी लोक आहेत त्या लोकांच तुम्ही काय करणार आहात कारण ती लोक आजही आशा धरुन बसलेले आहेत काहींचा ५०० तर काहींचा २०० वा नंबर आहे तर त्या लोकांसाठी तुम्ही काय करणार आहात या लोकांना पहिली घरे देणार आहात का? आणि दुसरं म्हणजे काळेवाडी मधील १८ मी.रस्त्यामध्ये जे  बाधीत लोक झालेली आहेत त्यांना आपण तुमच्या सांगण्यानुसार आपण जनरल बॉडीमध्ये विषय केला त्यांना घरकुलामध्ये घर देणार तर त्या लोकांना तुम्ही या प्रकल्पामध्ये घर देणार आहात का, का दुसरा प्रकल्प झाल्यानंतर त्यांना त्यामध्ये घरे देणार आहात याचाही आपण खुलासा करावा.

**मा.दत्तात्रय साने** -  मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह एक तर एवढा चांगला विषय आणलेला आहे आयुक्तांना हा ऐनवेळचा विषय आणण्याची घाई का होती हे मला काय कळेना एकाच दिवशी विषय आणायचा आणि सभागृहापुढे मांडायचा आणि

,

परत आमच्यात आमची लावुन द्यायची अशी तुमची खोड गेली नाही असं मला वाटतं. विषय लगेच आमच्या समोर आणताय  वाचा आणि लगेच मंजुर  गरज नाही ना आम्ही चांगल्या विषयाला कधीच विरोध करीत नाही. जर हा विषय विषयपत्रिकेवर आला असता तर आम्ही तो वाचून काही चांगल्या सूचना आपल्याला दिल्या असत्या नां पण तुम्ही विषय एकदम आणायचा आणि मंजुर करुन घ्यायचा उद्या काय झालं तर विरोधक काय झोपले होते का  अशी बातमी उद्या येईल. महापौर साहेब,माझी आपल्याला विनंती आहे की, विषय चांगला आहे या विषयाला आम्ही काही चांगल्या  सूचना पण करणार आहोत चांगल्या सूचना करायच्या असताना हा विषय मंजुर करण्याची घाई कशाला करता. आज विषय आणायच्या आधी हा विषय आम्हांला घरी पाठवला असता तर या विषयाची आम्ही चांगली माहिती घेतली असती काही चांगल्या सूचना केल्या असत्या तेंव्हा या विषयावर पुढच्या मिटींगमध्ये चांगली चर्चा करुन मंजुर करावा दुसरं या विषयाच्या बाबतीत अनेकवेळा या सभागृहामध्ये चर्चा केलेली आहे घरकुल आणि पंतप्रधान आवास योजना यामधील फरक काय आहे याबाबत सुध्दा तुम्ही जर आम्हांला काय दाखवणार असाल तर घरकुलची रचना आणि घरकुलचं घर  याच्यामध्ये किती स्केअरफुट आणि कशी रचना आहे आणि पंतप्रधान आवास योजना त्याच घर आणि त्याची रक्कम याचं विभाजन करुन आम्हांला सांगावं आणि दुसरं किती स्केअरफुटाचं घर घरकुलला दिलं आहे त्याचा रेट काय होता आणि किती स्केअरफुटाचं घर आपण घरकुलामध्ये दिलं आहे आणि त्याचा रेट काय आहे त्याची सुध्दा सभागृहाला  किंवा संपुर्ण शहराला त्याची माहिती व्हावी. तिसरं महापौर साहेब, यामध्ये ४०,४०,२० टक्के असं म्हणलेलं आहे. तीन टप्प्यामध्ये नागरीकांनी त्यांना पैसे द्यायचे आहे. पंतप्रधान आवास योजनेमध्ये तुम्ही आर्थीक दुर्बल घटकांनाही  घर देणार आहे तर यामध्ये एखादया व्यक्तीला हे घर अलॉट झालं  परंतु मला सर्वसामान्य म्हणुन मला त्या घराचा लाभ घेता येत नाही,मला कुठलं लोन मिळत नाही कारण तो स्वत:च  आर्थीक दुर्बल घटकातील आहे. त्यांच कुठलही बॅलन्स् सिट नाही,त्याच्याकडे आर्थीक सोअर्सेस नाही.अशा लोकांना जर तुम्ही त्या बांधकामाच्या किती टप्प्यावर पहिला स्लॅपवर त्यांनी पैसे द्यायचे,किती टप्प्यावर त्यांनी दुसरा स्लॅप द्यायचा आणि बांधकाम पुर्ण झाल्यावर त्यांनी किती पैसे द्यायचे याच्यामध्ये कुठलाही उल्लेख नाही. हे करीत असताना तुम्ही च-होलीमध्ये एका माणसांकडुन तीन वेगवेगळे रेट लावुन पैसे घेतलेले आहेत. हे पैसे घेताना सर्वसामान्य नागरीक याला एखादं घर लागलं तर त्याला आर्थीक सोअर्सच्या बाबतीत तुम्ही काय करणार आहात. पण घरकुलच्या माध्यमातून अनेक प्रकरणं आजही पेंडींग आहेत. त्यांच बॅलंन्स शिट

,

नसल्यामुळै कुठलीही बँक त्यांना लोन मंजुर करीत नाही. मग अशा वेळेस जर ३५०० लोकांपैकी ५० टक्के लोकांना घर लागलं परंतु त्याची पैसे द्यायची ऐपत नसेल तर त्यावेळेस आपण काय करणार आहात हा ही महत्वाचा प्रश्न आहे याच्यामध्ये तुम्ही हा उल्लेख केलेला नाही. लोकांकडुन पैसे घ्यायचं सांगितलं आहे पण ते कसे घ्यायचे,कशा पध्दतीने करणार आहात,कशा पध्दतीने त्यांना हप्ते देणार आहात अशाच एका सर्वसामान्य बिल्डरकडनं एखादया नागरीकांन घर घेतलं तर त्याला २० वर्ष,२५ वर्ष त्याला हप्ते देतात याला कारण तो कुठे तरी कामगार असतो त्याचा पगार चालू असतो त्याला आर्थीक कोणी तरी जामीनदार होतो असे जो कोणी कामगार असतो त्याला ते मिळतं. पण या माझ्या सर्वसामान्य माणसाला जर त्याला पगार नाही,त्याचा कुठं आर्थीक हिशोबच नाही त्याला कुठं रुपया देणार नाही,त्यानं बँकेमध्ये काही दाखवलं नाही किंवा तो रोज १०० रु.कमावतो, त्याच्याकडे वेगळं अस काही नाही,तो मजुरी करीत असेल त्याचं कुठंही काही रेकॉर्ड नसेल आणि अशा माणसाला जर घर लागलं तर त्याच्या बाबतीत तुम्ही काय करणार आहात. तर हीच परिस्थिती पाठीमागं घरकुलच्या प्रकल्पामध्ये अशी अनेक प्रकरणं आहेत. ज्यांना घरांची गरज आहे ती माणसं झोपडपट्टीमध्ये राहतात त्या लोकांना घर देता येत नाही कारण तुम्हांला जी ४/५ लाख रु.भरायची आहेत ते तुम्हांला देवु शकत नाही. कारण कुठलीही बँक त्यांना कर्ज देवु शकत नाहीत चल बाहेर जा असं म्हणतात. अशा माणसांसाठी तुम्ही काय करणार आहात तुम्हांला जर या योजनेचा सर्वसामान्य लोकांसाठी उपयोग करायचा असेल,खरंच या लोकांना तुम्हांला घरे द्यायची असतील तर या सगळयाचा समावेश होणं गरजेचं आहे. पंतप्रधान आवास योजना भाजपनं केली, घरकुल योजना राष्ट्रवादीने केली करताना जो कोणी करीत असेल कोणीही वाईट करीत नाही. करताना प्रत्येकाचा हेतू सरळ असतो सर्वसामान्यांना न्याय मिळावा असा हेतू असतो पण परत त्याच्या मागणं कोणी तरी बोंबलायला नको. याला घर भेटलं नाही,त्याला घर भेटलं नाही, त्यांनी आमच्या घरी यायचं ते आम्हांला सांगणार आम्हांला कुठलं तरी कर्ज काढुन दे ठिक आहे एखाद्या व्यक्तीला नगरसेवक मदत करु शकतो पण १०० लोकांना मदत करु शकत नाही. यामध्ये हा एक महत्वाचा विषय आहे. दुसरा यामध्ये आपण जे ४०,४०,२० टक्के केलेलं आहे बिल्डरच्या नियमानुसार त्याच्याकडुन फ्लॅट घेतल्यानंतर त्याचे काही स्लॅप ठरलेले असतात एक,दोन,तीन टप्पे असे ठरलेले असतात.तीन टप्यामध्ये त्याला पैसे द्यायला सांगतात ठिक आहे पण त्याने पैसे द्यायचे कधी तुमच्या रेराचा नियम काय आहे. जोपर्यंत तुम्ही १०० टक्के बांधकाम पूर्ण करीत नाही तोपर्यंत त्याच्याकडनं कुठलेही पैसे

,

घ्यायचे नाहीत. असे मला वाटते मी ऐकलंय,वाचलयं, किंवा यामध्ये माझे म्हणणे चुकीचे सुध्दा असेल. पण अस असताना त्याच्याकडनं तुम्हांला घर द्यायच्या आधी तुम्ही त्याच्याकडनं ४०,४०,२० टक्के पैस् घेणार याचं कारण काय समजलं नाही एक तर मुळ जागा आपली आहे या बांधकामासाठी ज्या बिल्डरांना काम दिलेले आहे ते आपले जावई आहेत आपण पिंपरी चिंचवड शहरामध्ये बांधकामाचे जे रेट आहेत त्याच्यापेक्षा हाय रेटनी त्यांना काम दिलेलं आहे. ठेकेदारांना एक नंबर,दोन नंबर,तीन नंबर हे कसे बसवतात हे मला माहित आहे. ते मी नंतर सांगेन असे असताना आपण आपली जागा त्यांना फक्त बांधकामासाठी दिलेली आहे. त्याच्यामध्ये ऍमेनिटीज नाही अमेनिटीजसाठी सेकंड टेंडर काढणार आहोत असे मला वाटते माझं हे म्हणणं बरोबर आहे की नाही हे माहित नाही कारण यामध्ये खुलासा होणं महत्वाचं आहे. कारण त्यावेळेस क्ळेल की, माझ्या शहराच्या नागरीकांना आणि सभागृहाला कळेल की, बिल्डरचं विदाऊट अमेनिटीजचं फक्त बांधकामासाठी या हेवी रेटनी जे महानगरपालिकेच्या कुठल्याही कानाकोप-यात पाहिलं तर १७०० ते १८०० रु.बांधकामाचा रेट आहे तिथं आपण २६०० ते २८०० रु. पर्यंत रेट दिलेला आहे. हे मान्य करावं लागेल. माझी आपल्याला विनंती आहे की, सर्वसामान्य नागरीकांचा विचार करीत असताना जर माझ्या एखाद्या गरीबाला घर मिळालं नाही त्याची जबाबदारी महानगरपालिका काय घेणार आहे हे सांगावं. आणि ४०,४०,२० टक्के यामध्ये काय सेव्हींग आहे त्याचा खुलासा करावा कारण त्याच लोन १५ वर्ष असणार आहे का,२० वर्ष असणार आहे. कारण एखादया सर्वसामान्य नागरीकांच २०/२५ वर्ष लोन असतं त्या पध्दतीनं तुम्ही त्याला देणार आहोत. पहिल्या ६ महिन्यात पहिला टप्पा दुस-या ६ महिन्यात दुसरा टप्पा असं काही लिहीलं नाही. टप्पे फक्त कागदावरचं आहेत. यासंबंधीची सविस्तर माहिती देणेत यावी अशी विनंती करतो. आणि या विषयामध्ये अजुन चांगल्या सूचना घेवु यामध्ये घाई करण्याची काही गरज नाही. पुढच्या मिटींगमध्ये अजुन साधक-बाधक चर्चा करु. आमचा या विषयाला विरोध नाही पण या विषयामध्ये अजुन काही त्रुटी आहेत त्याचा विचार करु. या तिन्ही प्रकल्पाची आपण संपुर्ण माहिती घेऊ तोपर्यंत हा विषय पुढील सभेमध्ये घेणेत यावा. अशी विनंती करतो.धन्यवाद.

**मा.उषा मुंढे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आयुक्त साहेब आपण चांगला विषय आणलेला आहे त्याबद्दल मी आपले अभिनंदन करते. परंतु हा विषय करीत असताना ज्यावेळेस २०१२ मध्ये घरकुल योजना आहे त्यावेळेस अनु.जमातीच्या लोकांनी अर्ज केले होते त्यामध्ये ११२ अर्ज होते ते अर्ज पात्र असुन सुध्दा ते अपात्र

,

ठरवून अपात्र ठरवल्यानंतर त्या नागरीकांना ५० हजार रु. डिपॉझिट भरण्यासाठी त्यांना पावत्या कशा काय आलेल्या आहेत. आणि हया पावत्या आल्यानंतर त्या लोकांचे अर्ज पात्र झाले परंतु अनु.जमातीच्या लोकांची जी यादी होती त्या यादीतील लोकांची नांवे काढुन त्याठिकाणी इतर लोकांना ती घरकुल देण्यात आली. आणि हे २०१२ मध्ये झालं तसंच आता पण या योजनेमध्ये झालं तर साहेब, हा विषय एवढा चांगला विषय आहे त्याचा व्यवस्थित अभ्यास करुन करावा. आपण अनेक योजना राबवितो परंतु त्यामध्ये राजकारण करुन ज्या लोकांना खरचं घरकुलाची गरज असते त्या लोकांना त्यापासून वंचित ठेवलं जातं. ज्यावेळेस २०१२ मध्ये घरकुल योजना आणली त्यामध्ये अनु.जमातीच्या लोकांना वंचित का  ठेवलं गेलं याचा विचार करावा. जे अर्ज अपात्र आहेत त्याचा विचार करु नये पण ज्यांचा अर्ज पात्र असताना, त्याला डिपॉझिट भरण्यास सुध्दा  सांगितले, अनु.जमातीच्या लोकांसाठी ११२ घरकुल आरक्षीत होती. आणि त्यापैकी आपण फक्त १२ घरकुलं दिली. आणि बाकीची जी १०० घरे होती ती कोणाला दिली, का दिली कोणाच्या सांगण्यावरुन दिली याचीही माहिती देण्यात यावी. मी जवळ,जवळ दोन वर्ष झाली याचा पाठपुरावा करीत आहे. नागरीक मला दररोज विचारीत असतात काय झालं आपल्या घरकुलाचं अशा लोकांना आपण घरापासून वंचित ठेवणार असाल तर याठिकाणी ज्या योजना राबवित आहात त्याचा काय उपयोग होणार आहे. जे स्थानिक लोक आहेत त्यांचा पहिला विचार करणेत यावा आणि मी जी माहिती विचारलेली आहे त्याची माहिती देणत यावी त्यानंतर हा विषय मंजुर करणेत यावा.

**( मा.पंतप्रधान आवास योजनेचे सादरीकरण सभागृहामध्ये दाखविण्यात आले.)**

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब,सन्मा.सभागृह  प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ४ व्हर्टीकल्स आहेत याच्यापैकी व्हर्टीकल ३ जे Affordable Housing in Partnership जे आहे याच्या माध्यमातुन आपण हे प्रकल्प घेतलेले आहेत पार्टनरशिपचा जो विषय तुम्ही मगाशी म्हणाला होता तो असा आहे की, व्हर्टीकलचं नांव AHP  आहे म्हणुन तो पार्टनरशिपचा विषय आहे. AHP मध्ये जसं पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप तत्वावर सुध्दा Affordable Housing  Create  करता येऊ शकतं त्याच धर्तीवर गर्व्हमेंटच्या यंत्रणा देखील त्याच्यामध्ये सहभागी होऊ शकतात. त्या अंतर्गत महानगरपालिका देखील स्वत:च्या अक्वायर केलेल्या जागेमध्ये हा प्रकल्प आहे आणि योजनेचे नांव AHP असल्यामुळे Private Partner Housing  चा उल्लेख झालेला आहे. या योजनेअंतर्गत योजनेचे जे स्वरुप आहे त्यामध्ये EWS  कॅटेगिरीमध्ये बसणा-या लाभार्थ्यांसाठी ही

,

योजना आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये राहणा-या नागरीकांकडे स्वत:च्या नावावर सदनिका नाही आणि ज्यांच उत्पन्न वार्षीक ३ लाख रु.पेक्षा कमी आहे. अशा नागरीकांसाठी ही सदनिका उपलब्ध आहे. यापुर्वी आपण जो सर्व्हे केलेला होता हा केवळ डिमांड सर्व्हे होता. शहरामध्ये किफायतशिर दराची किंवा प्रधानमंत्री आवास योजनेच्या चार विविध प्रकल्पाचे जे आराखडे आहेत त्याच्यामध्ये कुठल्या स्वरुपाच्या घराची मागणी नागरीकांची आहे. याची पडताळणी करण्याकरीता आपण फॉर्म गोळा केलेले होते. त्याच्या माध्यमातुन सुमारे ६० हजार नागरीकांचे अर्ज आपल्याकडे प्राप्त झाले आहेत. ज्याच्याकडे ४ व्हर्टीक्ल्स आहेत. जे नागरीक झोपडपट्टी परिसरात रहातात त्याच्यासाठी Encitive Slum Development हा पहिला व्हर्टीकल आहे. त्याच्यासाठी वेगळयाने Slum सर्व्हे देखील करण्यात येत आहे. पण अनेक झोपडपट्टयामधील नागरीकांनी अर्ज करुन झोपडपट्टी पुनर्वसन अशी देखील मागणी असु शकते. दुसरा जो होता CSS म्हणजे Credit Subsidy Scheme या व्हर्टीकल मध्ये गृहप्रकल्प प्रायव्हेट डेव्हलपर्सच्या माध्यमातुन निर्माण होत असतात त्या प्रकल्पामध्ये देखील हे घर एखादा लाभार्थी घेऊ शकतो किंवा बुक करु शकतो. त्याच्याकडे जर स्वत:च दुसरं घर नसेल तर त्याला सुमारे अडीच लाखापर्यंत इन्टरेस्ट सबसिडी त्यानं घेतलेल्या लोन वरती त्याला डायरेक्ट बॅंकेकडनं त्याला उपलब्ध होणार आहे. या व्हर्टीकल्ससाठी अनेक नागरीकांनी मागणी केलेली आहे. तिसरी जी व्हर्टीकल आहे ती Affordable Housing in Partnership याच्याकडे Private प्रकल्पामार्फत असेल किंवा सरकारी यंत्रणा जसे की म्हाडा, सिडको,पीएमआरडीए ,पीसीएमसी किंवा पीसीएनटीडीए या संस्था देखील घरबांधणी प्रकल्प आणु शकतात आणि त्यांनी बांधलेल्या घरामध्ये त्यांनी ठरवलेल्या प्रकल्प मुल्यांनुसार नागरीकांकडनं ते मुल्य घेत असताना त्या संपुर्ण घराच्या मुल्यांमध्ये प्रति सदनिका अडीच लाख रु. इतकं त्यामध्ये केंद्र शासन आणि राज्य शासनाकडनं मिळाल्यामुळे त्या प्रकल्पाची त्या घराची किंमत कमी होणार आहे. किफायतशिर घर देण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने यापुर्वी जो ठराव मंजुर केलेला आहे त्या ठरावामध्ये एक घर अधिक किफायतशिर करण्याच्या हेतूनं याच्यामधलं लॅण्ड कॉस्ट हे जमीनीचं मुल्य हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आपला सहभाग म्हणुन प्रकल्पाला देणार आहे. आणि अमीनिटी डेव्हलपमेंटची जी कॉस्ट आहे ती देखील पिंपरी चिंचवड महानगरपालिका त्या पुर्ण प्रक्ल्पामध्ये आपण बेअर करणार आहोत. हे या प्रकल्पातलं आपलं योगदान राहणार आहे. त्यामुळे जे केवळ बांधकामाचं टेंडर काढुन करुन घेत आहे त्यातनं अडीच लाख वजा जाता ते केंद्र शासन आणि राज्य शासनाकडनं मिळणार आहेत उर्वरित जी

रक्कम आपल्याला  खर्च करुन पडती आहे तेवढीच फक्त आपण लाभार्थ्यांकडनं वसुल करण्यासाठी ती मुल्य निश्चित करुन सभागृहाची मंजुरी घेत आह्योत. यामध्ये कोणते लाभार्थी अर्ज करु शकतात ज्या लाभार्थ्यांकडे EWS   कॅटेगिरीमध्ये आहे ज्याच्याकडे स्वत:च घर नाही  त्यांच्याकडे पुर्ण भारतभर कुठेही स्वत:च्या मालकीचं घर असता कामा नये. ही त्याच्यातील अट आहे. आणि त्यांच वैयक्तीक उत्पन्न ३ लाखापेक्षा कमी असलं पाहिजे.या अटीनुसार आपण नागरीकांच्याकडनं अर्ज मागवित आह्योत. अर्ज मागवित असताना जसं की,आता सदस्यांनी सांगितलं की,अनेक गरीब नागरीकांना बँका कर्ज देत नाहीत. शेवटी त्यांना जे ६ ते ७ लाख रु. शुल्क भरावयाचे आहेत हे त्यांना कुठून ना कुठून तरी त्यांना प्रोव्हाईड करायचंच आहे. एक तर त्यांनी बँकेकडुन किंवा स्वत:च्या सेव्हींगमधन करायचं आहे. कुठल्या ना कुठल्या स्त्रोततनं नागरीकांना त्यांचा शेअर भरावाच लागणार आहे. आणि त्यामुळेच सुरुवातीपासूनच बँकेशी त्यांना जोडणी करुन बँकेच्या माध्यमातुन त्यांच्यासाठी बँकेची कर्ज प्रकरणं करणं आणि टप्याटप्याने त्या पध्दतीने एखादा प्रायव्हेट डेव्हलपर टप्पे टप्पे काढुन त्यांना भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देतो त्या पध्दतीनं आपण हया प्रकल्पामध्ये त्यांचा सहभाग नोंदविणे अपेक्षित करीत असल्यामुळे आज आपण हा प्रस्ताव जनरल बॉडीच्या समोर आणलेला आहे. यामध्ये तीन टप्याचे ४०,४०,२० टक्के केलेले आहेत हे देखील बांधकामाच्या प्रमाणामध्ये त्यांना निधी रेस करणं सोप जावं याकरीता तीन टप्यामध्ये आपण गोळा करण्याचं धोरण ठेवलेलं आहे. ज्यांना बँकेकडनं कर्ज प्रकरण होईल त्यांना ते सुलभ राहणार आहे. कारण बँकेची पेमेंट करणारी त्याप्रमाणे आता प्रायव्हेट डेव्हलपर्सच्या बाबतीत झालेली आहे. पण ज्यांना स्वत:च्या सेव्हींगमधुन पेमेंट करायचं असेल किंवा अन्य स्त्रोतापासून पेमेंट करायचं असेल त्यांच्यासाठी सुध्दा आपण या तीन टप्प्यामध्ये वसुली करणार आह्योत. त्याच्यामध्ये जे तीन टप्पे आहेत पहिला टप्पा आहे तीन स्लॅप पहिला भाग पूर्ण झाल्यानंतर ४० टक्के आहे. दुसरा टप्पा आरसीसी वर्क पूर्ण झाल्यानंतरचा आहे. आणि तिसरा टप्पा जो आहे तो बांधकाम पूर्ण झाल्यानंतर,अमॅनिटीज झाल्यानंतर, पझेशनच्या वेळेला २० टक्क्याचा टप्पा आहे. असे तीन टप्पे आपण साधारणत: आताच्या बांधकामाची स्टेज ठरवून साधारणता कुठल्या महिन्यामध्ये टप्पे येतील याचं शेडयुल आपण ठरवणार आह्योत आणि ज्यावेळेला आपण अर्ज मागवु त्यावेळेला त्याच ग्लॉसेप तयार होईल.आणि त्या ग्लॉसेपमध्ये हे शेडयुल देखील साधारणत: त्यांना एक,एक महिन्यांची त्यांना मुदत देवुन त्या महिन्यामध्ये ते गोळा होतील अशा प्रकारे आपण त्यांना फॉर्म सोबत ग्लॉसेप देत त्याच्यामध्य उल्लेख असणार आहे.  यासोबत अजुन एक

,

महत्वाची गोष्ट सांगायची आहे की, ५ हजाराचं जे शुल्क आपण प्रस्तावित केलेलं होतं हे केवळ ॲडव्हान्स स्वरुपामध्ये अनेक लाभार्थी याच्यामध्ये इच्छुक असणार आहेत परंतु प्रत्येक लाभार्थ्याला त्याच्या स्वत:च्या फायनन्शियल पोझीशन कारण तीन लाखाच्या उत्पन्नापर्यंत अनेक टप्पे असण्याची शक्यता आहे. जे लाभार्थी स्वताची सेव्हीग किंवा बँक त्यांच्याकडे तारण देवु शकतील अशा प्रकारची ज्यांची क्षमता आहे असे लाभार्थी सिरीयसली लाभ घेंण्यासाठी अर्ज करावेत याकरीता आपण ५ हजार रु. सुरुवातीचं ॲप्लीकेशनची फी म्हणुन धरलेली होती. जी की,त्यांच्या अंतिम टप्प्यामधुन वसुल करण्याचं प्रस्तावित आहे. पण पूर्ण प्रक्रियेला सिरीएसनेस असावा त्याच्यामध्ये जे लाभार्थी ६ ते ७ लाख रु.भरु शकतील अशा लाभार्थ्यांसाठी आपण हे ५ हजार रु. प्रस्तावित केलेले आहेत ते अर्जासोबत जमा करायचे आहेत. तीन प्रकल्पच आपण का करतो आहे पाच प्रकल्प सुरु आहेत.आकुर्डी, पिंपरी वाघेरे याठिकाणी प्रकल्प सुरु आहे त्याचा समावेश का नाही हा प्रश्न विचारण्यात आला होता.मी हे सांगू इच्छितो की, आकुर्डी आणि पिंपरी वाघेरेचे हे जे दोन प्रकल्प सुरु आहेत ते HDH  या आरक्षणाच्या अगेन्स्ट सुरु आहेत. प्रधानमंत्री  आवास योजनेमध्ये अनेक ठिकाणी ज्या ठिकाणी प्रकल्प बाधीत नागरीक शहरामध्ये असतील आणि त्यांची घरं जर विविध प्रकल्पाने बाधीत होत असतील तर त्यानांच या दोन प्रकल्पामध्ये  HDH असल्यामुळे त्यांना प्राधान्य देण्यात येत आहे. आणि त्यामुळे ज्या ज्याठिकाणी रस्ता प्रकल्प असेल किंवा आरक्षण प्रकल्प् असेल आणि त्याच्यामध्ये जर काही प्रकल्प बाधीत असतील तर त्यांना प्राधान्य देवुन त्यांना या घरामध्ये त्यामुळे त्यांना  लॉटरी पध्दतीने सामान्य नागरीकांकडनं जे अर्ज मागविण्यात येणार आहेत त्याच्यासाठी जे काही सध्या घरं उपलब्ध नसल्याने त्यांचा समावेश या प्रक्रीयेमध्ये करणेत येत नसून केवळ सध्याच्या स्थितीमध्ये च-होली येथील १४४२ घरकुल,रावेत येथील ९३४ घरकुलं,बो-हाडेवाडी येथील १२८८ घरकुलं अशी एकुण ३६६४ सदनिका योच्यासाठी अर्ज मागविण्याची प्रक्रीया आपण करतो आहोत. आता एक विषय मांडण्यात आला की, आपल्या प्रकल्पाची किंमत ण्वढी का जास्त आहे.मी सभागृहास सांगु इच्छितो की, आपली जी निविदा प्रक्रीया झालेली आहे ती अत्यंत पारदर्शीपणाने झालेली आहे कुठल्याही नगरसदस्यांना किंवा नागरीकांना कोणालाही या प्रक्रीयामध्ये कुठल्या कॉस्ट आहे याची पडताळणी करायची असेल तर पूर्ण डेटा उपलब्ध आहे. केवळ अनेकांच्या मनात असा संदेह आहे की, प्रायव्हेट लोक १७०० ते १८०० रु.दराने बांधकाम करतात आणि आपण २७०० ते २८०० रु.दराने बांधकाम का करतोय. तर मी थोडक्यात याठिकाणी निवेदन करु इच्छितो की, आपण ज्या पध्दतीनं डेव्हलपर्स

,

कॉस्टींग करुन विक्री करतात त्या पध्दतीनं आपण विक्री करत नसुन आता आपण फक्त कारपेटच्या दराने कॅलक्युलेशन करत आहोत. ज्या पध्दतीनं डेव्हलपर्स त्याचे असेसमेंट करतात त्या पध्दतीने आपण असेसमेंट केली तर प्रती स्केअर फुट आपला दर सुध्दा १८०० रु.पेक्षा कमी प्रत्येक सदनिकेचा येतो आहे. याचे सविस्तर विवेचन ज्यांना कोणाला बघायचे असेल त्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेच्या कार्यालयामार्फत आपल्याला त्याच निश्चित सादरीकरण पूर्ण कुठल्या प्रकारच्या कॉस्ट त्याच्यामध्ये केलेल्या आहेत याचं सविस्तर सादरीकरण आम्ही आपल्याला देवु. मात्र आपण नेट कॉस्ट पूर्ण प्रकल्पाची प्रती स्केअरफुटच्या कारपेट व्हॅल्युच्या आगेनस्ट कॅलक्युलेट करतो. त्याच्यात अन्य कुठलेही कॉस्ट इतर वेगवेगळया पध्दतीने फोड करुन किंवा बिल्टअप एरिया,सुपर बिल्टअप एरिया या पध्दतीने आपण विचार करीत नसल्यामुळे आपली नेट कॉस्ट २७०० रुपये जरी दिसत असली तरी अंतिम कॉस्ट जो लाभधारक आहे त्यांनाही साधारणत: साडे नऊ लाखाच्या आसपास त्या बांधकामाचं मुल्य येत आहे. त्यामुळे आपला देखील दर इतर सदनिका डेव्हलपर्स प्रमाणे सुमारे १८०० रु.पेक्षा कमीच एकुण अस्तित्वात आहे. सगळयात महत्वाचा जो मुद्या आहे की, आपण याची प्रक्रिया कशी करणार आहोत. आपण ऑनलाईन पध्दतीनं अर्ज मागवणार आहोत. ऑनलाईन पध्दतीनं अर्ज मागवत असताना ते स्वत:चा अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर अंतिम केल्यास त्याच्यामध्ये चुका नाहीत व्यवस्थित त्याची कॅटेगिरी तपासली आहे. हे केल्यानंतर त्याच्या स्वत:चा अर्जाचा प्रिंटआऊट घेतील प्रिंटआऊटला त्यांचे कागदपत्र जोडतील आणि जो काही फी आपले सभागृह निश्चित करतील आता आम्ही ५००० रु.केलेली आहे. त्या ५००० रु.चा डीडी त्या अर्जासोबत जोडतील. प्रत्येक फॉर्म हा एकाच स्किमसाठी असतील जर त्याला तीन स्किमसाठी अर्ज करायचा असेल तर त्याला तीन वेगवेगळे फॉर्म प्रिंट करुन त्या,त्या स्किमचा अर्ज करुन तीन वेगवेगळे डीडीसह भरावे लागेल. यासोबतच अनेकांच्या मनात एक संदेह आहे की,ज्या भागात मी राहतो त्याच भागासाठीच्या स्कीमसाठी अर्ज करु शकतो का? तर तसं नाही पिंपरी चिंचवड मधील राहणारा कुठलाही नागरीक पिंपरी चिंचवड मधील कुठल्याही स्कीमसाठी अर्ज करु शकतो. त्यामुळे तो एक,दोन किंवा तीनही स्कीमसाठी अर्ज करु शकतो. मात्र सगळे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यातल्या पात्र अर्जधारकांमधुन लॉटरी पध्दतीनं आपण याच अलॉटमेंट करणार आहोत. सन्मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने जे कॅटेगिरी म्हाडाच्या रिर्झव्हेशननुसार आपल्याला लागु आहेत त्याच रिर्झव्हेशननुसार आपण कॅटेगिरी याठिकाणी लागू करणार आहोत. आरक्षणाची पध्दत सुध्दा याठिकाणी म्हाडाच्या पध्दतीनुसार ठेवलेली आहे. आणि

,

याकरीता लाभार्थी निवडताना जे कोणी कॅटेगिरीमधील लाभार्थी असतील त्यांना त्या कॅटेगिरीची विहीत प्रमाणपत्र सोबत जोडावं लागेल. अर्जासोबत त्यांचे कागदपत्र घेतो आहोत. त्यामुळे चुकीचे लाभार्थी यामध्ये येणार नाहीत. याची खबरदारी पूर्णपणे घेण्यात येणार असुन त्या पध्दतीनंच अंमलबजावणी करण्यात येणार आहे. घरकुल मध्ये इतकी समस्या उद्भवलेली आहे त्याची चौकशी पूर्ण झालेली असुन जे लाभार्थी आहेत त्यांना लवकरात लवकर कसे लाभ देता येईल याच्यासाठी इंदलकरसाहेबांनी जे कोणी लाभार्थी राहिलेले असतील ते त्या उरलेल्या लाभार्थ्यांमध्ये घरकुल द्यायची आहेत ते याच्यामध्ये कसे ॲडजेस्ट करता येतील याचा लवकरात लवकर उपक्रम राबविणं गरजेचं आहे. या पध्दतीने आपण आता फक्त केवळ अर्ज मागविण्याची प्रक्रीया करतो आहोत. आपण तीन टप्प्यामध्ये रक्कम का घेत आहोत याचे कारण सध्या प्रति सदनिकेचा दर ९ ते १० लाख रु.च्या दरम्यान खर्च आहे. आणि हे पूर्ण करण्यासाठी २४ ते ३६ महिन्याचा कालावधी लागणार आहे. या संपुर्ण कालावधीमध्ये आपल्याला केवळ अडीच लाख रु. ते ही बांधकामाच्या प्रमाणामध्ये आपल्याला प्रती सदनिका राज्य शासन आणि केंद्र शासनाकडनं मिळणार आहे. उर्वरित निधी जोपर्यंत बांधकाम होत आहे तोपर्यंत बांधकाम कंत्राटदारांना देणेची जबाबदारी ही महानगरपालिकेची आहे. हे कॅशफ्लो आपल्याला मेन्टेन करायचे असेल तर आपल्याला नागरीकांकडन टप्याटप्याने निधी येत राहीला तर आपला देखील कॅशफ्लो मेन्टेन राहील आणि तेवढाच आपल्याला नेट फंड उपलब्ध राहील. या हेतुने आपण त्यांना तीन टप्प्यामध्ये निधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रस्ताव सभागृहासमोर आणलेला आहे. या उपर सभागृह जे काही निर्देश आम्हांला देतील त्याची अंमलबजावणी प्रशासनाच्या वतीने करण्यात येईल.

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह,अतिशय खुप चांगला विषय याठिकाणी मंजुरीसाठी आलेलाआहे. या तीनही प्रकल्पाच्या अंतर्गत च-होली याठिकाणी च-होली येथील १४४२ घरकुल,रावेत येथील ९३४ घरकुलं,बो-हाडेवाडी येथील १२८८ असे ३६६४ घरकुलं आहेत या तीन प्रकल्पाच्या व्यतिरिक्त पिंपरी आणि आकुर्डी त्याही प्रकल्पाचा विषय याठिकाणी का आणलेला नाही. कारण एकत्रच विषय याठिकाणी मांडला असता तर चांगल झालं असतं आणि या विषयामध्ये अनेक त्रुटी आहेत असे मत काही सदस्यांनी याठिकाणी व्यक्त केलं. ४०,४०,आणि २० टक्के हा जो टप्पा आयुक्त साहेबांनी सांगितलं आहे पण कदाचित त्यांनी हे डॉकेट मध्ये सांगितलं असत तर नगरसदस्यांना शंका कु शंका आल्या नसत्या अशा प्रकारे डुडुळगांवामध्ये सुध्दा असा

,

प्रकल्प करणे बाकी आहे. त्याचं मला वाटतं १० ते १५ गुंठयाची जागा ताब्यात घेणं बाकी आहे. आपण प्रयत्न करुन यावर्षी तो प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न करत होतो परंतु १० ते १५ गुंठयाची जागा ताब्यात न आल्यामुळे पुढच्या वर्षी आपण तो लवकरात लवकर पूर्ण करावा जेणेकरुन सिमाताईनी आणि निताताईंनी पण सांगितले आहे की, घरकुल योजनेमध्ये ज्या ५० टक्के लोकांना घरे मिळाली आहेत आणि ५० टक्के लोकांची वेटींगलिस्टची यादी आहे अशा संदर्भातील सर्व नगरसेवकांचा विचार करता मी सन्मा.महापौर ताईंना विनंती करतो की, विषय क्रमांक ११ तहकुब करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.सुरेश भोईर** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सदर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता--

ठराव क्रमांक- ५०६ विषय क्रमांक-११

दिनांक २०/१/२०२० खाते- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापलिका आयुक्त यांचे
जा.क्र.स्था/EWSप्र/७०/२०२० दि.१८/१/२०२०
२) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.
स्था/EWSप्र/७१/२०२० दि.१८/१/२०२०

विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकुल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

,

ठराव क्रमांक- ५०७ विषय क्रमांक-१२

दिनांक २०/१/२०२० खाते- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.पापु/मुख्य/९९/२०२० दि.२०/०१/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी पवना धरणात एकूण १८५.६७ द.ल.घ.मी. आरक्षण मंजूर आहे. सध्या पवना नदीमधून पाणी उचलले जाते. वहनव्यय लक्षात घेता प्रतिदिनी ४८० एम.एल.डी. पाणी उपलब्ध होते.

सध्या म.न.पा.ची पाणी उचलणे व शुध्दीकरण करण्याची स्थापीत क्षमता ४२८ एम.एल.डी.आहे. ओव्हर लोडींग करुन ४८० एम.एल.डी. इतके पाणी उचलले जाते. या वर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला तथापि मर्यादीत क्षमतेमुळे म.न.पा. स जादा पाणी उचलता येत नाही.

यासाठी एकूणच पाणी उचलणे व शुध्दीकरणाची क्षमतेत वाढ केल्यास ज्या वर्षी जादा पाऊस होईल, त्या वर्षी जास्त पाणी उचलणे शक्य होईल यासाठी रावेत येथील पंपींग मशीनरी व जलशुध्दीकरण केंद्र यांची क्षमता वाढविण्याची कामे तातडीने हाती घेणे आवश्यक आहे. सदर कामाचा म.न.पा.च्या सन २०१९-२० च्या अंदाजपत्रात समावेश नसल्याने अंदाजपत्रकातील, “विशेष योजना” या लेखाशिर्षाखाली, ‘रावेत येथील पंपींग मशीनरी व सेक्टर क्र. २३ येथील जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता वाढविणे’ या कामाचा अंदाजपत्रक १ मधील (अनु.क्र.१३), पानांक २६२) नव्याने समावेश करुन त्यासाठी रक्कम रु. ५० कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब,ठरावास अनुमोदन देतो.

**मा.महापौर** – सदर विषयाची माहिती निकम साहेब देतील.

**मा.मकरंद निकम (कार्यकारी अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, आपली पवना नदीतून पाणी उचलण्याची जी क्षमता आहे ती ४२८ एमएलडी आहे. आणि जलशुध्दीकरणाची क्षमताही ४२८ एमएलडी आहे. सध्या आपण जे स्टँडर्ड पंप असतात ते लावून ४८० एमएलडी पर्यंत पाणी उचलू शकतो. त्याच्या पुढं आपल्याला उचलता येत नाही. कारण त्याची क्षमताच तेवढी आहे. परंतु यावर्षी कसं झालं आहे पाऊस भरपुर पडतो पण आपली उचलण्याची क्षमता नसल्यामुळे पाणी देवु शकलो नाही. त्यामुळे पाणी असुनही पाणी टंचाई निर्माण झाली आहे. यासाठी आपणाला रावेत येथील पंपींग मशीनरी व जलशुध्दीकरण केंद्र यांची क्षमता वाढविण्याची कामे तातडीने हाती घेणे आवश्यक आहे. यामध्ये आपण पंप बदलणार आहोत त्यामुळे आपण १०० एमएलडी पाणी जास्त पाणीपुरवठा करु शकतो.

,

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, आता आपण ४२८ एमएलडी पाणी उचलतो आणि रावेत येथील पंपींग मशीनरी व जलशुध्दीकरण केंद्र यांची क्षमता वाढविण्याची कामे केली तर १०० एमएलडी पाणी जास्त उचलू शकतो. ज्याठिकाणाहून आपण पाणी उचलतो त्याठिकाणी आपण १०/१२ नगरसेवकांना घेवुन जावे. ज्याठिकाणी आपण पंपींग करतो त्याठिकाणी एवढा मोठा गाळ आहे. तो गाळ माझ्या माहिती प्रमाणे पावसाळयाच्या आगोदर काढला होता. आताही त्याठिकाणी त्याच्या दुपटीने गाळ त्याठिकाणी आलेला आहे. आपण याठिकाणी म्हणतोय आपण शुध्द पाणी पितोय परंतु ज्याठिकाणाहून आपण पाणी पितो त्याठिकाणी जनावरं मेलेली आहेत. सडलेली आहेत आम्ही ४/५ जणांनी त्याठिकाणी बघुन आलेलो आहे. आणि म्हणुन तो जो पाणी उचलण्याचा परिसर आहे तो स्वच्छ करावा आणि जो गाळ साठलेला आहे तो काढणेत यावा आणि जो संप केलेला आहे तो स्वच्छ ठेवणेत यावा अशी विनंती करतो.

**मा.महापौर** – मा.आयुक्त साहेबांना आदेश देण्यात येत आहे की, काकांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याप्रमाणे ज्याठिकाणाहून आपण पाणी उचलतो त्याठिकाणचा परिसराची पहाणी करणेत यावी आणि त्याठिकाणी साठलेला गाळ काढणेत यावा. व परिसर स्वच्छ ठेवणेत यावा अशी सूचना करते.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, आयुक्त साहेब,आपल्याला १०० एमएलडी पाणी उचलण्याची राज्य शासनाने परवानगी दिलेली आहे का? एकंदर आपली जी लोकसंख्या वाढलेली आहे आणि आपण राज्य शासनाकडुन रितसर परवानगी आणावी कारण आपण पाटबंधारे खात्याला दंड देवुन पाणी घेण्यापेक्षा राज्य शासनाकडे मागणी केली तर निश्चितपणे आपली मागणी पूर्ण होईल. किमान दंड भरुन का होईना आपण पाणी आणणार आहात कारण लोकांची गरज आहे त्यामुळे हा विषय मंजुर करणेत यावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

,

**मा.महापौर** – सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**(**उषा उर्फ माई मनोहर ढोरे**)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/६/कावि/०७/२०२०
दिनांक - १/७/२०२०



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

,